नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ४थे | अंक : १६१ | किंमत : ४ रूपये
Gmail : aklgavakari@gmail.com
Gmail : punegavkari@gmail.com




महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक

# समर्थ गांवकरी

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे
POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026




सोमवार, दि. २५ मे २०२६

मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

## थोडक्यात...

### 'मेस्सी' बनला अब्जाधीश

न्यूयॉर्क (स. गांवकरी) : अर्जेंटिनाचा महान फुटबॉलपटू लियोनेल मेस्सी अधिकृतपणे अब्जाधीशांच्या क्लबमध्ये सामील झाला आहे. 'ब्लूमबर्ग बिलियनेअर्स इंडेक्स'च्या अहवालानुसार, ही ऐतिहासिक कामगिरी करणारा तो त्याचा दीर्घकालीन प्रतिस्पर्धी ख्रिस्तियानो रोनाल्डोनंतरचा जगातील दुसराच फुटबॉलपटू ठरला आहे. ब्लूमबर्गच्या विश्लेषणानुसार, 38 वर्षीय मेस्सीने 2007 पासून केवळ पगार आणि बोनसच्या माध्यमातून 700 दशलक्ष डॉलर्स (सुमारे 521 दशलक्ष पौंड) पेक्षा जास्त कमाई केली आहे. त्यानंतर कर रचना, बाजारपेठेतील चढ-उतार, जागतिक गुंतवणूक आणि विविध नामांकित ब्रँडस्च्या जाहिरातींमधून मिळालेला परतावा या सर्वांचा हिशेब करून मेस्सीची एकूण संपत्ती आता 1 अब्ज डॉलर्सच्या पार गेली आहे. अल-नासर क्लबचा स्टार खेळाडू ख्रिस्तियानो रोनाल्डो 2023 मध्ये सौदी अरेबियामध्ये गेल्यानंतर अब्जाधीश बनणारा पहिला फुटबॉलपटू ठरला होता, आता इंटर मियामीचा कर्णधार मेस्सीनेही त्याच्याशी बरोबरी केली आहे.

# वनवासी समाज सनातन संस्कृतीचा आत्मा

## जनजातीय महाकुंभात अमित शहा यांचे प्रतिपादन

■ भगवान बिरसा मुंडा यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त दिल्ली येथे जनजातीय महाकुंभाचे आयोजन

नवी दिल्ली: (स. गांवकरी)

नवासी समाज हा सनातन संस्कृतीचा आत्मा आहे," असे प्रतिपादन केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी केले. भगवान बिरसा मुंडा यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त दिल्लीत आयोजित जनजातीय महाकुंभात ते बोलत होते. यावेळी त्यांनी आदिवासी समाज आणि सनातन परंपरेतील नात्यावर भाष्य केले. आदिवासी समाजाची निसर्गपूजक परंपरा, जल-जंगल-जमिनीशी असलेले नाते आणि सामुदायिक जीवनपद्धती ही भारतीय संस्कृतीची खरी ओळख असल्याचे त्यांनी नमूद केले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली आदिवासी विकासाला राष्ट्रीय प्राधान्य देण्यात आल्याचे सांगत त्यांनी आदिवासी कल्याणासाठी वाढवण्यात आलेल्या निधीचाही उल्लेख केला.

देशभरातील विविध जनजातीय समुदाय पारंपरिक वेशभूषा, लोकवाद्ये आणि सांस्कृतिक सादरीकरणांसह या महाकुंभात सहभागी झाले होते. या कार्यक्रमाला छत्तीसगडचे मुख्यमंत्री विष्णू देव साय, मंत्री केदार कश्यप, महाराष्ट्र सरकारमधील मंत्री अशोक उईके, खासदार माया इवनाते तसेच विविध राज्यांतील जनजातीय प्रतिनिधी उपस्थित होते.

अमित शाह म्हणाले की, "हा केवळ एक कार्यक्रम नाही, तर भगवान बिरसा मुंडा यांच्या उलगुलानानंतर देशाला एकत्र बांधणारे मोठे सांस्कृतिक आंदोलन आहे." उपस्थित जनसमुदायात बिरसा मुंडा यांच्या संघर्षाची आणि विचारांची झलक दिसत असल्याचेही त्यांनी सांगितले.

भाषणादरम्यान अमित शाह यांनी मतातरणाच्या मुद्द्यावरूनही भूमिका स्पष्ट केली. "संविधान प्रत्येकाला आपल्या धर्म आणि परंपरेनुसार सन्मानाने जगण्याचा अधिकार देते. मात्र लोभ, लालच किंवा दबाव टाकून मतांतरण करण्याचा अधिकार कोणालाही नाही," असे ते म्हणाले. आदिवासी समाजाला त्यांच्या मूळ संस्कृतीपासून दूर करण्याचे प्रयत्न सुरू असल्याचा आरोपही त्यांनी केला.



### माओवादी हिंसाचारावर भाष्य

छत्तीसगड आणि बस्तरचा उल्लेख करताना अमित शहा म्हणाले की, अनेक दशकांपासून माओवादी हिंसाचारामुळे आदिवासी भागांचा विकास खुंटला. "माओवादी हिंसाचारात ४० हजारांहून अधिक आदिवासींचा बळी गेला. मात्र आता परिस्थिती वेगाने बदलत आहे," असा दावा त्यांनी केला.

समान नागरी संहिता (यूसीसी) संदर्भातील चर्चांवर बोलताना अमित शहा म्हणाले की, भाजपशासित राज्यांमध्ये लागू करण्यात आलेल्या यूसीसीमध्ये आदिवासी समाजाच्या परंपरा आणि अधिकारांचे संरक्षण करण्यासाठी विशेष तरतुदी करण्यात आल्या आहेत. "यूसीसीमुळे जनजातीय समाजाच्या परंपरांमध्ये कोणताही हस्तक्षेप होणार नाही," असे त्यांनी स्पष्ट केले.

# राजस्थानची प्ले-ऑफमध्ये 'रॉयल'धडक! ३० धावांनी नमवले

मुंबई : (स. गांवकरी)

वेगवान गोलंदाज जोफ्रा आर्चरच्या अष्टपैलू कामगिरीच्या जोरावर राजस्थान रॉयल्सने मुंबई इंडियन्सचा 30 धावांनी पराभव करत या विजयासह यंदाच्या आयपीएल हंगामातील प्ले-ऑफचे चौथे आणि शेवटचे तिकीट निश्चित केले. आर्चरने आधी फलंदाजीत अवघ्या 15 चेंडूंत 32 धावांची वादळी खेळी केली आणि नंतर गोलंदाजीत आपल्या 4 षटकांच्या कोट्यात अवघ्या 17 धावा देत 3 महत्त्वपूर्ण बळी टिपले. आर्चरच्या या अष्टपैलू 'शो'मुळे मुंबईचे आव्हान संपुष्टात आले. नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना राजस्थान रॉयल्सने निर्धारित 20 षटकांत 8 बाद 205 धावांचा डोंगर उभा केला. मुंबई इंडियन्सच्या गोलंदाजांनी शेवटच्या 5 षटकांत केलेला स्वैर मारा राजस्थानच्या पथ्यावर पडला. आर्चरच्या 15 चेंडूंतील 32 धावांच्या उपयुक्त खेळीमुळे राजस्थानला दोनशेपार मजल मारता आली. 206 धावांच्या मोठ्या आव्हानाचा पाठलाग करताना मुंबई इंडियन्सची सुरुवात अत्यंत निराशाजनक झाली. 'पॉवर प्ले'च्या पहिल्या 6 षटकांत मुंबईने अवघ्या 49 धावांत 4 बडे फलंदाज गमावले आणि इथेच सामन्याचे चित्र जवळपास निश्चित झाले. आर्चरने रोहित शर्माला (0) चकवा देत पहिले यश मिळवले व नंतर पाठोपाठ तिसऱ्या षटकात नमन धीरचा (6) त्रिफळा उडवला. त्यानंतर नांद्रे बर्गरने रायन रिकल्टनला (12) वैभव सूर्यवंशीकरवी झेलबाद करून मुंबईचे कंबरडेच मोडले. खराब फॉर्मशी झगडत असलेल्या तिलक वर्माला ब्रिजेश शर्माने पायचीत केले. त्यामुळे मुंबईची अवस्था 4 बाद 38 अशी बिकट झाली होती. या बिकट परिस्थितीतून सूर्यकुमार यादव आणि विल जॅक्स यांनी मुंबईचा डाव सावरला. दोघांनी पाचव्या गड्यासाठी 63 धावांची महत्त्वपूर्ण भागीदारी रचली. यादरम्यान राजस्थानच्या ब्रिजेश शर्माने सुमार क्षेत्ररक्षण केले. जीवदानाचा फायदा घेत सूर्यकुमारने 42 चेंडूंत 60 धावांची (4 षटकार, 3 चौकार) अर्धशतकी खेळी केली, तर विल जॅक्सने 18 चेंडूंत 33 धावांचे योगदान दिले. शेवटच्या 30 चेंडूंत मुंबईला 59 धावांची गरज होती आणि हार्दिक पंड्या 15 चेंडूंत 34 धावा करून क्रीजवर होता. 16 वे षटक टाकण्यासाठी आलेल्या जोफ्रा आर्चरविरुद्ध संयम राखण्याऐवजी हार्दिकने आक्रमक फटका मारण्याचा प्रयत्न केला.





# थोडक्यात पण महत्वाचे



## अवकाळी पावसाने आंबेगाव तालुक्यात मोठे नुकसान

■ बाधित भागांची पाहणी, शासकीय मदतीसाठी पाठपुरावा सुरू!

मंचर (स. गांवकरी) : आंबेगाव तालुक्यात काल सायंकाळी झालेल्या वादळी वारा, विजांचा कडकडाट आणि मुसळधार अवकाळी पावसामुळे पूर्व भागातील पारगाव, लाखणगाव आणि काठापूर परिसरात मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. या नैसर्गिक आपत्तीमुळे शेतपिके, मालमत्ता आणि पशुधनाचे मोठे नुकसान झाले असून अनेक शेतकरी अडचणीत आले आहेत. अवकाळी पावसामुळे अनेक पोल्ट्री फार्म, जनावरांचे गोठे, शेतातील घरे तसेच कांदाचाळी उद्ध्वस्त झाल्या आहेत. त्यामुळे शेतकरी बांधवांवर आर्थिक संकट कोसळले असून परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. या पार्श्वभूमीवर आज शिवसेना नेते मा. रमेशभाऊ येवले आणि शिवसेना नेते तथा जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष मा. अरुणभाऊ गिरे यांनी बाधित भागांना भेट देत नुकसानीची प्रत्यक्ष पाहणी केली. यावेळी त्यांनी नुकसानग्रस्त शेतकरी व नागरिकांशी संवाद साधत त्यांना धीर दिला. तसेच काही बाधित कुटुंबांना आर्थिक स्वरूपात रोख मदतही प्रदान करण्यात आली. यावेळी प्रशासनाशी संपर्क साधत अतिरिक्त जिल्हाधिकारी, तहसीलदार आणि तालुका पशुसंवर्धन अधिकारी यांना तातडीने पंचनामे करण्याच्या सूचना देण्यात आल्या. नुकसानग्रस्त शेतकरी आणि नागरिकांना शासकीय मदत लवकर मिळावी यासाठी पाठपुरावा केला जाणार असल्याचेही सांगण्यात आले. संकटाच्या या काळात शिवसेना शेतकरी आणि सर्वसामान्य नागरिकांच्या पाठीशी खंबीरपणे उभी असल्याचा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.




## अलिबाग-मुंबई मार्गावरील बसला भीषण आग; जीवितहानी टळली!

नवी मुंबई (स. गांवकरी) : अलिबागहून मुंबईच्या दिशेने जाणाऱ्या MH 03 EG 9277 क्रमांकाच्या बसला अचानक भीषण आग लागल्याची घटना घडली. या घटनेमुळे काही काळ परिसरात घबराटीचे वातावरण निर्माण झाले. सुदैवाने या दुर्घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नसली तरी बसचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, बस अलिबागहून मुंबईकडे प्रवास करत असताना अचानक आग लागली. घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दलाचे जवान तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी शर्थीचे प्रयत्न करत आगीवर नियंत्रण मिळवले व मोठी दुर्घटना टाळली. दरम्यान, पोलिस प्रशासनानेही तातडीने घटनास्थळी धाव घेत परिसरातील वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी ट्रॅफिक नियंत्रणाचे काम केले. त्यामुळे वाहतूक कोंडी टाळण्यास मदत झाली. आग लागण्याचे नेमके कारण अद्याप समोर आले नसून संबंधित यंत्रणांकडून घटनेचा पुढील तपास सुरू आहे.



## निकिता रौंदळची मीरा-भाईंदर पोलीस दलात कॉन्स्टेबल पदी निवड

■ जिद्द, सातत्य आणि कष्टाच्या जोरावर शेतकरी कुटुंबातील लेकीने मिळवले मोठे यश

कळवण (स. गांवकरी) : कळवण तालुक्यातील भेंडी येथील शेतकरी कुटुंबातील श्री नितीन वामन रौंदळ यांची कन्या निकिता नितीन रौंदळ हिने आपल्या जिद्दीच्या, मेहनतीच्या आणि सातत्यपूर्ण अभ्यासाच्या जोरावर मीरा-भाईंदर पोलीस दलात पोलीस कॉन्स्टेबल पदी निवड होऊन संपूर्ण परिसराचे नाव उज्वल केले आहे. तिच्या या यशामुळे भेंडी गावासह संपूर्ण परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून सर्व स्तरातून तिच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे. आजच्या स्पर्धेच्या युगात पोलीस भरती परीक्षा ही अत्यंत कठीण आणि मेहनतीची समजली जाते. शारीरिक क्षमता, मानसिक तयारी आणि अभ्यासातील सातत्य या सर्व बाबींमध्ये स्वतःला सिद्ध करावे लागते. अशा कठोर परीक्षेत निकिताने चिकाटी, आत्मविश्वास आणि प्रामाणिक परिश्रम यांच्या बळावर हे यश संपादन केले आहे. विशेष म्हणजे, शेतकरी कुटुंबातील आर्थिक आणि सामाजिक आव्हानांवर मात करत तिने हे स्वप्न साकार केल्याने तिच्या यशाचे महत्त्व अधिक वाढले आहे. निकिताच्या या यशामागे तिच्या कुटुंबीयांचे मोलाचे योगदान असल्याची भावना अनेकांनी व्यक्त केली. आई-वडिलांचे प्रोत्साहन, कुटुंबाची साथ आणि स्वतःची अथक मेहनत यामुळेच ती या पदापर्यंत पोहोचू शकली. “गावातील मुलींनीही मोठी स्वप्ने पाहावीत आणि मेहनतीच्या जोरावर ती पूर्ण करावीत,” असा प्रेरणादायी संदेश निकिताच्या यशातून समाजासमोर आला आहे.

## जुन्नर तालुक्यात पावसाची हजेरी



खोडद (स. गांवकरी) : जुन्नर तालुक्याच्या पूर्व व मध्य भागात बुधवारी सायंकाळी साडेचार ते साडेपाच वाजण्याच्या दरम्यान ढगांच्या गडगडाटासह मुसळधार पाऊसाने आणि गारांच्या तडाख्याने हजेरी लावली .या पावसामुळे शेती पिकांचे मोठे प्रमाणात नुकसान झाले.बांगरवाडी परिसरात सुमारे अर्धा तास गारांचा पाऊस झाला. यामुळे परिसरातील शेतकऱ्यांचे कांदा, टोमॅटो ,आंबा, डाळिंब ,शेतातील उन्हाळी बाजरी अशा इतर भाजीपाला पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. तालुक्यात सकाळपासूनच ढगाळ वातावरण होते. प्रचंड उकाडा जाणवत होता. पाच ते साडेपाच वाजण्याच्या सुमारास बांगरवाडी परिसरात गारांचा मुसळधार पाऊस झाला. गारांच्या तडाख्यामुळे डाळिंब, टोमॅटो इत्यादी पिकाचे मोठे नुकसान झाले. पाणीटंचाईचा सामना करत अतिशय प्रतिकूल परिस्थितीत शेतकऱ्यांनी उन्हाळ्यात डाळिंब बाग व टोमॅटो जोपासली होती. डाळिंबाची झाडे फळांनी लगडलेली होती.

# विश्वकल्याणासाठी भव्य ऋग्वेद स्वाहाकार व विष्णुयाग

### वेदघोष, मंत्रोच्चार आणि भक्तिमय वातावरणात पूर्णाहुती; हजारो भाविकांची उपस्थिती

■ अहिल्यानगर जिल्हा ब्राह्मण सेवा संघाच्या उपक्रमाने अधिक मासात निर्माण झाला अध्यात्मिक उत्साह



अहिल्यानगर : (स. गांवकरी)

जगभरात निर्माण झालेल्या अस्थिरता, संकटे आणि नकारात्मकतेचे निवारण होऊन विश्वात शांतता, समृद्धी आणि मंगलमय वातावरण निर्माण व्हावे या उदात्त हेतूने चितळे रोड येथील ऋग्वेद भवनात अधिक मासानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या भव्य ऋग्वेद स्वाहाकार व विष्णुयागाची अत्यंत भक्तिमय वातावरणात पूर्णाहुती करून सांगता करण्यात आली. अहिल्यानगर जिल्हा ब्राह्मण सेवा संघ संचलित महर्षी वेद विद्यालयाच्या वतीने आयोजित या वैदिक सोहळ्याने संपूर्ण परिसर अध्यात्मिक उर्जेने भारावून गेला होता. यागाच्या कालावधीत दररोज पहाटेपासून वेदघोष, मंत्रोच्चार, हवन, पूजन आणि विविध वैदिक विधींनी ऋग्वेद भवन परिसरात भक्तिरसाचा दरवळ निर्माण केला होता. वैदिक परंपरेचे जतन आणि संवर्धन करण्याच्या उद्देशाने आयोजित या उपक्रमाला भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

अहिल्यानगर जिल्हा ब्राह्मण सेवा संघाचे उपाध्यक्ष राजकुमार जोशी यांच्या विशेष मार्गदर्शनाखाली या धार्मिक सोहळ्याची सुरुवात झाली. यजमान प्रसाद कडेकर व अशोक कुलकर्णी सपत्नीक यांच्या शुभहस्ते अग्नी प्रदीपन करून भव्य ऋग्वेद स्वाहाकार व विष्णुयागास प्रारंभ करण्यात आला.

यानंतर प्रायश्चित्त विधी, श्रीगणेश पूजन, पुण्याहवाचन, मातृकापूजन, नांदीश्राद्ध, योगिनी मंडल पूजन, वर्धिनी कलश पूजन, भैरव मंडल, रुद्र मंडल तसेच नवग्रह पूजन यांसारखे विविध वैदिक विधी अत्यंत शास्त्रोक्त पद्धतीने पार पडले. वेदमंत्रांच्या निनादाने परिसर दुमदुमून गेला होता.

यजमान चंद्रचूड गोंगले, अशोक कुलकर्णी, राजेंद्र भणगे, अॅड. शिरीष गटणे , अनिलकुमार जोशी,निनाद देव यांच्या हस्ते ऋग्वेद हवन, स्थापित देवता हवन, बलिदान, पूर्णाहुती व महाआरती करण्यात आली. विशेष म्हणजे दररोज पाच यजमानांच्या हस्ते ऋग्वेद स्वाहाकार व विष्णुयाग संपन्न होत होता.

या धार्मिक विधीमध्ये सहभागी होण्यासाठी भाविकांनी मोठी गर्दी केली होती. या प्रसंगी संघाचे अध्यक्ष किशोर जोशी, मयूर जोशी, अमोल कापरे, प्रसाद कुलकर्णी, सागर गोवर्धन, अवधूत भणगे, श्रीकांत जोशी, ओम जोशी, गणेश भालेराव ,प्रदिप जोशी घनपाठी प्रतिकजी मुळे, आनंद जोशी यांच्यासह ब्रह्मवृंद व अनेक मान्यवर उपस्थित होते. सर्वांच्या उपस्थितीत वातावरण अधिक भक्तिमय आणि उत्साहपूर्ण झाले होते.पूर्णाहुतीनंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले. भाविकांनी मोठ्या श्रद्धेने महाप्रसादाचा लाभ घेतला. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी राजकुमार जोशी यांनी अथक परिश्रम घेतले.

तसेच बन्सीमहाराज मिठाईचे संचालक राजकुमार जोशी परिवाराच्या वतीने दररोज अन्नदानाची सेवा करण्यात आली. या सेवाकार्याबद्दल भाविकांनी समाधान व्यक्त केले. अधिक मासानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या या भव्य वैदिक सोहळ्यामुळे अहिल्यानगर शहरात धार्मिक आणि अध्यात्मिक वातावरण निर्माण झाले असून वैदिक संस्कृतीचा जागरही प्रभावीपणे दिसून आला.

## संवादभूषण मध्ये अहिल्यानगरचे वृतछायाचित्रकार अनिल शाह

अहिल्यानगर : (स. गांवकरी)

विविध प्रकारच्या प्रसार माध्यमांमध्ये,वृतपत्र क्षेत्रात कार्यरत प्रेरणादायी अश्या व्यक्तिमत्त्वांची दखल घेऊन त्यांच्या आजपर्यंन्तच्या वाटचालीवर प्रकाश टाकणारे, स्फुर्तिदायक असे "संवादभूषण" हे पुस्तक राज्याचे निवृत्त माहिती संचालक व न्युज स्टोरी टुडे या जागति पातळीवरील पोर्टलचे निर्माते देवेंद्र भुजबळ यांनी नुकतेच प्रकाशित केले आहे. या पुस्तकात ३४ प्रेरणादायी व्यक्तीमत्वांचा समावेश असुन या पुस्तकाचे प्रकाशन मुंबई मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष संदीप चव्हाण आणि इतर मान्यवरांच्या हस्ते नुकतेच लोणावळा येथे संपन्न झाले. या पुस्तकात अहिल्यानगर येथील ज्येष्ठ वृतछायाचित्रकार अनिल विनोद शाह यांचाही आजपर्यंन्तच्या वृत छायाचित्रण क्षेत्रातील कार्याचा समावेश झाला असून अहिल्या नगरवासियांनसाठी ही अभिमानास्पद बाब आहे. शाह परिवार गेल्या चार पिढ्या नपासुन छायाचित्रण क्षेत्रात कार्यरत आहे.




त्यामुळे अनिल शाह यांच्यावरील लेखात आजोबा गुलाबचंदजी, वडील विनोद शाह,भाऊ प्रमोद,दिपक उदय व सुनिल व आता काही भावाची मुले या छायाचित्रण क्षेत्रात कार्यरत आहेत चार पिढ्यांचे या. पुस्तकात नगर जिल्ह्याच्या जडणघडणीत असलेले योगदान देखील अधोरेखित करण्यात आले आहे. शहा परिवाराने आपल्या छायाचित्रण तसेच वृत छायाचित्रण क्षेत्रातील आपल्या वाटचालीतून स्वतःची एक स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे.ती अनिल आजही जपत आहे.

## उंचखडक बु शाळेचे पंधरा विद्यार्थी शिष्यवृत्ती परिक्षेत यशस्वी

अकोले : (स. गांवकरी)



मागिल वर्षी इयत्ता पाचवीचा वर्ग सुरु केला आणि प्रत्येक स्पर्धा परिक्षेत या शाळेने उतुंग भरारी घेतली. नवोदय विद्यालय, सैनिकी स्कुल, लक्षवेध, गणित-विज्ञान, सावित्रीबाई फुले, अशा विविध स्पर्धांमधून विद्यार्थ्यांनी शाळेचे नाव जिल्हा पातळीवर झळकविले. आता नुकताच शिष्यवृत्तीचा निकाल लागला, यात जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे 15 विद्यार्थी यशस्वी ठरले आहेत. त्यामुळे, तीन वर्षापुर्वी बंद पडलेली शाळा आज राज्याच्या पटलावर गुणवत्तेच्या दृष्टीकोणातून जात आहे. या गोष्टीचे जिल्हा शिक्षणाधिकारी भास्कर पाटील यांनी कौतुक केले आहे. तसेच गोविंद खोकले, रवि रुपवते, विक्रम गायकर, काळु तपासे आणि शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष अॅड. सागर शिंदे यांचे कौतुक केले आहे. तर यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे. इयत्ता पाचवीच्या शिष्यवृत्ती परीक्षेचा निकाल नुकताच ऑनलाईन जाहीर करण्यात आला आहे. त्यात जिल्हा परिषद प्रा. शाळा उंचखडक बु येथील 15 विद्यार्थी यशस्वी झाले आहेत. त्यात विराज बडे, निशिता बोराडे, वाकचौरे विराज, पवार ईश्वरी, शौर्य काकड, शिंदे स्वरा, खोकले सोहम, ईशिता बोराडे, शौर्यजीत वाकचौरे, नेहा मधे, सार्थकी सोनवणे, ईश्वरी कोरडे, सार्थक लहामटे, सुदर्शन म्हस्के, सानिध्य भोयर या विद्यार्थ्यांनी यश संपादन केले आहे. यातील निशिता बोन्हाडे आणि स्वरा शिंदे या दोन विद्यार्थीनी नवोदय विद्यालयास पात्र ठरल्या असून 18 विद्यार्थी उत्तीर्ण झाले होते. तसेच सोहम खोकले आणि इशिता बोन्हाडे हे दोन विद्यार्थी सौनिकी स्कुलसाठी पात्र ठरले आहेत. हे यश फक्त एक वर्षातील असून यासाठी गोविंदे खोकले आणि बडे मॅडम यांनी गुणवत्ता कायम ठेवण्याचे काम केले आहे. खरंतर शासनाच्या शैक्षणिक उदासिन धोरणामुळे विद्यार्थ्यांना शिक्षक मिळु शकले नाहीत. तरी सुद्धा शाळा व्यवस्थापन समितीने एम ए झालेल्या बडे मॅडम यांची खाजगी शिक्षक म्हणून मानधन तत्वावर नियुक्ती केली आणि त्यांनी विद्यार्थ्यांना सर्वोत्तम पद्धतीने शिकविण्याचे काम केले. त्याच्या प्रयत्नाचे देखील हे फळ आहे. मात्र

या यशात गोविंद खोकले यांचा सिंहाचा वाटा आहे. तसेच गटशिक्षण अधिकरी बाळासाहेब दोर्गे, रवि रुपवते, विक्रम गायकर, काळु तपासे तत्कालिन गटशिक्षणाधिकारी आरविंद कुमावत, केंद्रप्रमुख सुनिल नरसाळे सर यांचे सर्वेत्तम मोलाचे सहकार्य लाभले आहे अशी माहिती शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष अॅड. सागर शिंदे यांनी दिली.

## हिंदू मंदिरांच्या जमिनी वाचवण्यासाठी सभापतींना निवेदन

अहिल्यानगर : (स. गांवकरी)

■ देवस्थानांच्या जमिनी काढून घेणारा कायदा मंजूर करू नका : मंदिर महासंघ

■ सुप्रिम कोर्टात सुनावणी सुरू होणार



देवस्थान इनाम निर्मूलन कायद्याच्या मसुद्याविरोधात राज्यभरातील मंदिर संस्था, पुजारी संघटना आणि हिंदुत्वनिष्ठ कार्यकर्त्यांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र मंदिर महासंघ यांच्या वतीने राम शिंदे यांना सविस्तर निवेदन देण्यात आले. निवेदनात नमूद करण्यात आले की, मंदिरांच्या इनामी जमिनी या केवळ मालमत्ता नसून त्या धार्मिक परंपरा, सांस्कृतिक वारसा आणि समाजसेवेचा आधार आहेत. अनेक मंदिरांचे अन्नछत्र, वेदपाठशाळा, धार्मिक उत्सव आणि विविध सेवा उपक्रम या जमिनींच्या उत्पन्नावर चालतात. त्यामुळे या जमिनी सरकारकडे वर्ग करण्याचा कोणताही प्रयत्न हिंदू समाजाला मान्य होणार नाही, असे प्रतिनिधींनी स्पष्ट केले. शिष्टमंडळाने सरकारवर हिंदू मंदिरांच्या व्यवस्थापनात हस्तक्षेप केल्याचा आरोप करत, इतर धर्मीय संस्थांच्या मालमत्तेबाबत अशा प्रकारची भूमिका घेतली जात नसल्याचेही नमूद केले. त्यामुळे हा मसुदा तातडीने मागे घ्यावा, अशी ठाम मागणी करण्यात आली.

यावेळी उपस्थित कार्यकर्त्यांनी “मंदिरांची जमीन वाचवा”, “देवस्थानांचा अधिकार अबाधित ठेवा” अशा घोषणाही दिल्या. राज्यभरातील मंदिर विश्वस्त, वारकरी संप्रदायातील प्रतिनिधी आणि विविध धार्मिक संस्थांनी या आंदोलनाला पाठिंबा दर्शवला असल्याची माहिती देण्यात आली.

सभापती राम शिंदे यांनी शिष्टमंडळाच्या भावना समजून घेत विषय शासनाच्या निदर्शनास आणून देण्याचे आश्वासन दिले.

भाजपा कार्यालयीन मंत्री मुकुल गंधे, अहिल्यानगर मंदिर महासंघ जिल्हा संयोजक भरत शिंदे ,अहिल्यानगर मंदिर महासंघ जिल्हा सहसंयोजक गणेश पलंगे , मंदिर महासंघ शहर संयोजक सुनील शिंदे , हिंदु जनजागृती समितीचे जिल्हा हिंदु संघटक बापू ठाणगे , हिंदु जनजागृती समितीचे जिल्हा समन्वयक रामेश्वर भुकन, भाजपा कार्यकारिणी सदस्य अधिवक्ता देवेंद्र बंब आदी यावेळी उपस्थित होते.

## अहिल्यानगर जिल्ह्यातून हद्दपार आरोपी जेरबंद

अहिल्यानगर : (स. गांवकरी)



■ चिंचपूर येथे स्थानिक गुन्हे शाखेची धडक कारवाई

जिल्ह्यातून हद्दपार करण्यात आलेल्या एका सराईत आरोपीस स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने चिंचपूर ता. पाथर्डी येथून जेरबंद केले आहे. हद्दपार आदेशाचे उल्लंघन करून तो विनापरवाना जिल्ह्यात वास्तव्यास असल्याची माहिती गुप्तबातमीदारामार्फत पोलिसांना मिळाली होती. मा. श्री. मुम्मका सुदर्शन, पोलीस अधीक्षक, अहिल्यानगर यांच्या आदेशान्वये तसेच पोलीस निरीक्षक श्री. किरणकुमार कबाडी यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस अंमलदार सुरेश माळी, सुयोग सुपेकर, रोहित येमुल व सागर ससाणे यांचे विशेष पथक तयार करण्यात आले होते. जिल्ह्यातून हद्दपार करण्यात आलेल्या रेकॉर्डवरील गुन्हेगारांचा शोध घेण्याच्या मोहिमेदरम्यान ही कारवाई करण्यात आली. दि. २१ मे २०२६ रोजी पथक पाथर्डी पोलीस ठाणे हद्दीत शोधमोहीम राबवत असताना, हद्दपार आरोपी सोनू उर्फ वैभव राजेंद्र बोरुडे (वय ३०, रा. चिंचपूर ता. पाथर्डी) हा स्वतःच्या घरी असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार पोलिसांनी चिंचपूर येथे जाऊन छापा टाकला असता संबंधित आरोपी आढळून आला. पोलिसांनी चौकशी केली असता त्याच्याविरुद्ध ५ डिसेंबर २०२५ पासून दोन वर्षासाठी अहिल्यानगर जिल्ह्यातून हद्दपार आदेश लागू असल्याचे स्पष्ट झाले. तरीदेखील त्याने आदेशाचे उल्लंघन करून जिल्ह्यात प्रवेश केल्याने त्याच्याविरुद्ध पाथर्डी पोलीस ठाण्यात महाराष्ट्र पोलीस कायदा कलम १४२ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# १७व्या राज्यस्तरीय शब्दगंध साहित्य संमेलनाचे जल्लोषात उद्‌घाटन!



अहिल्यानगर : (स. गांवकरी)

शब्दगंध साहित्यिक परिषदेच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या १७ व्या राज्यस्तरीय शब्दगंध साहित्य संमेलनाच्या “स्व. अरुणकाका साहित्य नगरी”चे उद्‌घाटन आज उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले.

महाराष्ट्र राज्याचे क्रीडा व युवक कल्याण तथा कृषी मंत्री दत्तात्रय विठ्ठल उर्फ दत्ता मामा भरणे यांच्या हस्ते या साहित्य नगरीचे उद्‌घाटन करण्यात आले. यावेळी आमदार संग्रामभैय्या जगताप, महापौर ज्योतीताई गाडे, स्थायी समिती सभापती सुभाष लोंढे, डॉ. पुरुषोत्तम भापकर, संपतदादा बारस्कर, कुमार वाकळे, गणेश भोसले, महेश लोंढे, प्रकाश भागानगरे, मोहित पंजाबी, प्रा. डॉ. संदीप सांगळे, डॉ. संजीवनीताई तडेगावकर, प्रा. डी. आर. जाधव, प्रा. विलास साठे, प्रा. बी. एल जाधव, प्रा.संजय घोडके, प्रा. हनुमंत गायकवाड, संपादक महेश भोसले, आरपीआयचे युवक जिल्हा अध्यक्ष अमित काळे,यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी महापुरुषांना अभिवादन करण्यात आले. त्यानंतर शाहिरी जलसा कार्यक्रमाने संमेलनाला विशेष रंगत आणली. शाहीर कल्याण काळे, भारुड सम्राट हमीद सय्यद, शाहीर भारत गाडेकर, वसंत डंबाळे, डॉ. शेषराव पठाडे, प्रशांत सूर्यवंशी, दिगंबर गोंधळी आणि हौसीनाथ बोर्डे आदी कलाकारांनी आपल्या प्रभावी सादरीकरणातून उपस्थितांची दाद मिळवली. स्वागताध्यक्ष सुरेश बनसोडे यांनी प्रस्ताविकातून संमेलनाची भूमिका स्पष्ट केली. यावेळी मार्गदर्शन करताना मंत्री दत्ता मामा भरणे म्हणाले की, “राज्यस्तरीय शब्दगंध साहित्य संमेलनामुळे नव्या पिढीत वाचनाची आवड निर्माण होणार आहे. ‘वाचाल तर वाचाल’ हा संदेश आजच्या युवकांसाठी अत्यंत महत्त्वाचा आहे. वाचनामुळे विचार समृद्ध होतात, चुकीच्या प्रवृत्तींपासून दूर राहता येते आणि जीवनाला सकारात्मक दिशा मिळते.” ते पुढे म्हणाले, “जीवनात घडण्यासाठी प्रत्येकाला कष्ट आणि चिकाटी आवश्यक असते. कोणाकडेही जादूची कांडी नसते. मी कृषी मंत्री झालो असलो तरी शेवटी शेतकऱ्याचाच मुलगा आहे. साहित्य संमेलन ही केवळ गर्दी नसून विचारवंतांची मेजवानी असते. येथे विचारांची देवाणघेवाण होते आणि समाजात वैचारिक संस्कार घडतात.” या संमेलनात प्रा. डॉ. गणी पटेल आणि आयु. अशोकराव गायकवाड यांना “शब्दगंध जीवनगौरव पुरस्कार कृषिमंत्री दत्ता भरणे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले. संमेलनादरम्यान विविध विषयांवरील परिसंवाद, काव्य संमेलन, गझल मैफल, चर्चासत्रे तसेच पुस्तक प्रकाशनाचे कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. “आधुनिक साहित्यातील स्त्री जीवनाचे चित्रण”, “बदलते ग्रामीण जीवन आणि ग्रामसंस्कृती” तसेच “असा मी घडलो...” यांसारख्या विषयांवर मान्यवर साहित्यिक, सामाजिक कार्यकर्ते आणि अभ्यासक मार्गदर्शन करणार आहेत.

आज रोजी होणाऱ्या समारोप कार्यक्रमास पालकमंत्री नामदार राधाकृष्ण विखे पाटील तसेच अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे अध्यक्ष योगेश सोमण उपस्थित राहणार असून, विविध साहित्य पुरस्कारांचे वितरण आणि “शब्दसंचित” ग्रंथाचे प्रकाशन करण्यात येणार आहे.

साहित्यिक, कवी, लेखक आणि साहित्य रसिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून संमेलनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन स्वागताध्यक्ष सुरेश बनसोडे, शब्दगंधचे संस्थापक सुनील गोसावी, अध्यक्ष राजेंद्र उदागे आणि संयोजन समितीच्या सदस्यांनी केले आहे. सदर कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अंकुश मोहिते, पप्पू पाटील, येशूदास वाघमारे, ऋषी विधाते, सतीश साळवे, याकूब वडागळे, दिपक सरोदे आदींनी परिश्रम घेतले.

# कळवण तालुक्यात वाढत्या उन्हाचा भाजीपाला पिकांना फटका

## टोमॅटो, काकडी, घेवडा, कोबीची वाढ खुंटली, फुलगळीमुळे उत्पादनात घट

कनाशी : (स. गांवकरी)

- तापमानाच्या तडाख्याने शेतकरी हवालदिल
- बाजारभाव नसल्याने दुहेरी संकट, इंधन टंचाईने कामे खोळंबली

मे महिन्याच्या अखेरीस पारा 44 अंशावर गेल्याने कळवण तालुक्यातील भाजीपाला पिके करपून जाऊ लागली आहेत. टोमॅटो, काकडी, घेवडा, कोबी, वांगी यांसारख्या नगदी पिकांची वाढ खुंटली असून, मोठ्या प्रमाणात फुलगळ होत आहे. एकरी 40 ते 50 हजार रुपये खर्च करूनही उत्पादन हाती येण्याची शाश्वती नसल्याने शेतकरी वर्ग हवालदिल झाला आहे.

गेल्या 15 दिवसांपासून तालुक्यात तापमानाचा पारा 42 ते 44 अंश सेल्सिअस दरम्यान आहे. सकाळी 10 नंतरच उन्हाचे चटके बसू लागतात. या तीव्र उन्हामुळे वेली व भाजीपाला पिकांची पाने करपू लागली आहेत. जमिनीत ओलावा टिकत नसल्याने पिकांना पाणी देऊनही उपयोग होत नाही.

"टोमॅटोच्या झाडाला आलेली फुले सकाळी बघावी तर दुपारपर्यंत गळून पडतात. काकडीच्या वेलाची वाढच थांबली आहे. घेवड्याच्या शेंगा धरतच नाहीत. कोबीचे गड्डे तयार होण्याआधीच पाने जळत आहेत," अशी व्यथा गंगापूर येथील शेतकरी संजय बहिरम यांनी मांडली

एक एकर टोमॅटो लागवडीसाठी बियाणे, मल्चिंग, ठिबक, खते, फवारणी व मजुरी असा 45 ते 50 हजार रुपयांपर्यंत खर्च येतो. काकडी, घेवडा लागवडीसाठीही 25 ते 30 हजार रुपये खर्च होतो. मात्र, सध्या उष्णतेमुळे उत्पादन 60 ते 70 टक्क्यांनी घटण्याची भीती आहे.

"बँकेचे कर्ज काढून, सावकाराकडून व्याजाने पैसे घेऊन पीक उभे केले. आता फुलच लागत नाही, तर माल कुठून येणार? खर्च तरी कसा निघणार?" असा सवाल उपस्थितत होत आहे.

"माल कमी निघाला, त्यात भाव नाही. मग शेतकऱ्याने जगायचे कसे? मुलांची फी, घरखर्च, औषधपाणी कसे भागवायचे?" असा संतप्त सवाल शेतकऱ्यांपुढे उभा आहे.

डिझेलचे दर गगनाला भिडले असून, सध्या 98 रुपये लिटर दर आहे. त्यातच ग्रामीण भागातील पंपांवर अनेकदा डिझेलच मिळत नाही. ट्रॅक्टरने नांगरणी, रोटावेटर मारणे, माल वाहतूक करणे परवडेनासे झाले आहे. पाणी उपसण्यासाठी लागणाऱ्या इंजिनचा खर्चही वाढला आहे.

"डिझेलसाठी 10-15 किमी लांब जावे लागते. तेही रांगेत उभे राहून मिळते. एका दिवसाचे काम दोन दिवसांत होते. मजूर मिळत नाहीत, मिळाले तर 400 रुपये रोज द्यावा लागतो. शेती करणे म्हणजे तोट्याचा धंदा झाला आहे.

उष्णतेच्या लाटेमुळे शेतकरी आधीच मेटाकुटीला आला असताना शासनाने तातडीने पंचनामे करून आर्थिक मदत जाहीर करावी, वीज व डिझेल पुरवठा सुरळीत करावा, अशी मागणी होत आहे. अन्यथा कर्जबाजारी शेतकरी आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल उचलेल, अशी भीती व्यक्त होत आहे.



"हवामान विभागाच्या अंदाजानुसार जूनच्या पहिल्या आठवड्यात तापमान ४८ ते ५० अंश सेल्सिअसपर्यंत जाण्याची शक्यता आहे. अशा परिस्थितीत शेतकरी बांधवांनी स्वतःसोबतच लहान मुलांची व वयोवृद्धांची विशेष काळजी घ्यावी.

उष्णतेचा तडाखा पाहता शेतीची मशागतीची कामे सकाळी 11 ते सायंकाळी 4 या वेळेत टाळावीत. पहाटे किंवा सायंकाळी 4 नंतरच शेतात काम करावे. शरीरातील पाण्याचे प्रमाण टिकवण्यासाठी जास्तीत जास्त पाणी प्यावे.

यंदा खरीप हंगामासाठी कमी पाण्यावर व कमी कालावधीत येणाऱ्या वाणांची निवड करावी. बाजरी, मूग, उडीद, सोयाबीन यांसारख्या पिकांना प्राधान्य द्यावे. ठिबक सिंचन व आच्छादन तंत्राचा वापर करून पाण्याची बचत करावी." - राजेंद्र सावंत, मंडळ कृषी अधिकारी, कनाशी

गत वर्षपिक्षा या वर्षी उन्हाचा पारा खूपच जास्त आहे. सध्या आम्ही शेतात टोमॅटो, वाल व घेवडा लागवड केली आहे. मात्र जास्त ऊन असल्यामुळे पिकांची सेटिंगच होत नाही. फुल लागते पण दुपारपर्यंत गळून जाते. एकरी 50 हजारांपर्यंत खर्च तर अवाच्या सव्वा करून झाला आहे. बियाणे, खते, औषधे, मजुरी सगळेच महाग झाले. पण वाढत्या उन्हामुळे पीकच जगत नाही. पाणी देऊन देऊनही जमिनीत ओलावा टिकत नाही. अशीच परिस्थिती राहिली तर पीक सोडून देण्याची वेळ येईल. आम्ही शेतकऱ्यांनी करायचे तरी काय?" - यशवंत गावित, शेतकरी, गंगापूर

# थोडक्यात पण महत्वाचे



## हवामान खात्याकडून महत्त्वाची अपडेट, पुढच्या तीन-चार दिवसांत

अहिल्यानगर (स. गांवकरी) : भीषण उकाड्याने आणि वाढत्या तापमानाने हैराण झालेल्या नागरिकांसाठी अत्यंत दिलासादायक आणि आनंदाची बातमी समोर आली आहे. भारतीय हवामान विभागाने (IMD) दिलेल्या ताज्या माहितीनुसार, आज २३ मे रोजी नैऋत्य मान्सूनने नैऋत्य अरबी समुद्र, आग्नेय अरबी समुद्र, कोमोरिन परिसर तसेच बंगालच्या उपसागराच्या आणखी काही भागांत यशस्वी प्रगती केली आहे. हवामान खात्याच्या माहितीनुसार, पुढील ३ ते ४ दिवसांत मान्सून आणखी वेगाने पुढे सरकण्यासाठी अत्यंत अनुकूल आणि पोषक परिस्थिती निर्माण झाली आहे. या आगामी काळात नैऋत्य व आग्नेय अरबी समुद्र, कोमोरिन क्षेत्र, बंगालच्या उपसागराचा आणखी मोठा भाग आणि उर्वरित अंदमान समुद्र मान्सूनच्या कक्षेत येण्याची दाट शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. यंदा नैऋत्य मान्सून वेळेआधीच केरळात दाखल होण्याची शक्यता आहे. सामान्यत: १ जूनच्या सुमारास पोहोचणारा मान्सून यंदा २६ मे रोजीच केरळ किनारपट्टीवर धडकू शकतो. बंगालच्या उपसागरात कमी दाबाचे क्षेत्र अधिक सक्रिय झाल्याने मान्सूनचा वेग वाढला आहे. विशेष म्हणजे, यंदा मान्सूनच्या सुरुवातीच्या टप्प्यात बंगालच्या उपसागरात किंवा अरबी समुद्रात कोणतेही चक्रीवादळ निर्माण झालेले नाही. त्यामुळे मान्सूनच्या प्रवासात कोणताही मोठा अडथळा येणार नसून तो सुरळीत पुढे सरकणार असल्याचे हवामान विभागाने स्पष्ट केले आहे. हवामान विभागाच्या अंदाजानुसार, मान्सूनचा प्रवास असाच सुसाट राहिल्यास ५ जूनला गोव्यात दाखल होण्याची शक्यता आहे. तर ६ जूनला कोकणात आणि ७ जूनला पुण्यात मान्सूनचे आगमन होण्याची शक्यता आहे. आता मान्सून महाराष्ट्रात नेमका कधी दाखल होणार? याकडे शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे.

## रखडलेल्या झेडपी, पंचायत समित्यांची निवडणूक कधी?



अहिल्यानगर (स. गांवकरी) : राज्यात ओबीसी आरक्षणाअभावी साधारण २० जिल्हा परिषदांच्या निवडणुका रखडलेल्या आहेत. या निवडणुका नेमक्या कधी होणार, असे नेहमीच विचारले जाते. या आरक्षणाबाबत सध्या सर्वोच्च न्यायालयात सुनावणी सुरू आहे. त्यामुळे निवडणुकीची घोषणा होताच पुन्हा एकदा राजकीय रणधुमाळी पाहायला मिळेल. एककीकडे राजकीय पक्ष या निवडणुकीसाठी तयारी करत असतानाच आता दुसरीकडे राज्याचे मुख्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांनी महत्त्वाची प्रतिकिया दिली आहे. त्यांनी या २० जिल्हापरिषदांच्या निवडणुका नेमक्या कधी होतील, याबाबत माहिती दिली आहे.राज्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांनी आज (२२ मे) पत्रकार परिषद घेतली. यावेळी त्यांनी राज्यभरात राबवल्या जाणाऱ्या एसआयआर प्रक्रियेची माहिती दिली. ही प्रक्रिया नेमकी कशी राबवली जाणार तसेच त्यासाठी नागरिकांनी काय करायचे आहे? नागरिकांना नेमके कोणते कागदपत्र दाखवावे लागणार आहेत? याबाबतची सगळी माहिती त्यांनी दिली. पुढे बोलताना त्यांनी रखडलेल्या २० जिल्हापरिषदांच्या निवडणुकीवरही भाष्य केलं. जिल्हा परिषदांच्या निवडणुका ओबीसी आरक्षणामुळे रखडल्या होत्या. २३ जुलै रोजी सर्वोच्च न्यायालय काय निकाल देते हे पाहू नंतर निवडणूक नेमकी कधी घ्यायची हे ठरवले जाईल, असे दिनेश वाघमारे यांनी सांगितले.

## आचारसंहिता संपली,जिल्हा परिषदेत रखडलेल्या बदल्या होणार

अहिल्यानगर (स. गांवकरी) : विधानपरिषद आचारसंहितेमुळे स्थगित करण्यात आलेली कृषी, आरोग्य, पशुसंवर्धन आणि ग्रामीण पाणीपुरवठा या चार विभागांची बदली प्रक्रिया सोमवार, दि. २५ मे २०२६ रोजी होणार आहे. प्रशासनाने याबाबतचे वेळापत्रक जाहीर केले आहे. यापूर्वी निर्गमित वेळापत्रकानुसारच ही प्रक्रिया पार पडणार आहे. २५ मे रोजी सकाळी ९.४५ वाजल्यापासून विभागनिहाय बदली प्रक्रिया सुरू होईल. सर्व संबंधित विभाग प्रमुखांनी त्यांच्या अधिनस्त तालुकास्तरीय यंत्रणा व संबंधित कर्मचाऱ्यांना याबाबत तात्काळ सूचित करावे व नियोजित वेळेनुसार कार्यवाही सुनिश्चित करावी, असे आदेश प्रशासनाने दिले आहेत.ही बाब अत्यंत महत्त्वाची असल्याने आवश्यक ती कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहे.

# राजनाथ सिंह व देवेंद्र फडणवीस यांनी घेतले साईबाबा समाधीचे दर्शन!



शिर्डी (स. गांवकरी)

मा.ना. श्री राजनाथ सिंह, केंद्रीय संरक्षण मंत्री भारत सरकार, तसेच मा.ना. श्री देवेंद्र फडणवीस, मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांनी शिर्डी येथे श्री साईबाबांच्या समाधीचे दर्शन घेतले. यावेळी पालकमंत्री मा.ना. डॉ. राधाकृष्ण विखे पाटील तसेच महाराष्ट्र राज्य विधानपरिषदेचे सभापती मा.ना. श्री राम शिंदे हे देखील उपस्थित होते. दर्शनानंतर श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी यांच्या वतीने श्री साईबाबा संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री गोरक्ष गाडीलकर यांच्या हस्ते केंद्रीय संरक्षण मंत्री श्री राजनाथ सिंह यांचा सत्कार करण्यात आला. या प्रसंगी उपस्थित मान्यवरांनी श्री साईबाबांच्या समाधीचे दर्शन घेत आशीर्वाद घेतले. शिर्डी येथे मान्यवरांच्या आगमनामुळे भाविकांमध्ये उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले.

# समर्थ आयटीआयच्या विद्यार्थ्यांना सुवर्णसंधी

## फिटर व इलेक्ट्रिशियन विभागातील ६ विद्यार्थ्यांची कॅम्पस ड्राईव्हमधून दमदार निवड

जुन्नर तालुका : (स. गांवकरी)

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या कौशल्याला उद्योग विश्वाची भक्कम दाद मिळाल्या चे पुन्हा एकदा सिद्ध झाले असून,समर्थ रुरल एज्युकेशनल इन्स्टिट्यूट संचलित समर्थ औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आयटीआय),बेल्हे येथील विद्यार्थ्यांनी कॅम्पस ड्राईव्हमध्ये यशाची उज्वल पताका फडकावली आहे.पिंपरी- चिंचवड येथील नामांकित कंपनी एक्साईड इंडस्ट्रीज प्रा.लिमिटेड यांच्या वतीने आयोजित मुलाखत प्रक्रियेत फिटर व इलेक्ट्रिशियन विभागा तील तब्बल सहा विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली. संस्थेच्या ट्रेनिंग अँड प्लेसमेंट विभागामार्फत आयोजित “कॅम्पस ड्राईव्ह २०२६” ला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.विद्यार्थ्यांचे तांत्रिक ज्ञान प्रभावी संवादकौशल्य,सॉफ्ट स्किल्स तसेच कलचाचणीच्या आधारे निवड प्रक्रिया पार पडल्याची माहिती कंपनीचे एचआर रिक्रुटमेंटएक्झिक्युटिव्ह अहमद सय्यद यांनी दिली.




यामध्ये फिटर विभागातून ओंकार घोलप व चैतन्य पवार, तर इलेक्ट्रिशियन विभागातून हर्षल ढवळे,सुमेध गवांदे, सिद्धेश डेरे आणि गणेश माने यांनी यश संपादन करत नामांकित कंपनीत नोकरीची संधी मिळवली.

या यशस्वी प्लेसमेंट मोहिमेसाठी उपप्राचार्य विष्णू मापारी,विलास सोनवणे, विकास कणसे आणि निकेश औटी यांनी विशेष परिश्रम घेत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

विद्यार्थ्यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष वसंत शेळके,उपाध्यक्ष माऊली शेळके सचिव विवेक शेळके,विश्वस्त वल्लभ शेळके,माजी जिल्हा परिषद सदस्या स्नेहल शेळके, कॅम्पस डायरेक्टर प्रा. राजीव सावंत,आयटीआयचे प्राचार्य पांडुरंग हाडवळे,उपप्राचार्य विष्णू मापारी तसेच प्रशासकीय अधिकारी प्रा.प्रदीप गाडेकर तसेच संकुलातील सर्व विभागा चे प्राचार्य,विभागप्रमुख, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन करून विद्यार्थ्यांच्या भावी वाटचालीस शुभेच्छांचा वर्षाव केला.“ग्रामीण विद्यार्थ्यां च्या हाताला कौशल्याची जोड आणि उद्योगविश्वाची साथ मिळाल्यास यशाची शिखरे सहज गाठता येतात,” हेच या निवडीमधून अधोरेखित झाल्याची भावना संस्थेचे विश्वस्त वल्लभ शेळके यांनी व्यक्त केली.

# समाजसेवक अनंत घाणे यांच्या पाठपुराव्याला यश

## रतनवाडी-साम्रद मुक्कामी एसटी सेवा पूर्ववत, १५ जूनपासून नवी दुपारची बसही धावणार!

अकोले : (स. गांवकरी)

अकोले तालुक्यातील सह्याद्रीच्या कुशीत वसलेल्या दुर्गम आदिवासी रतनवाडी आणि साम्रद गावांसाठी महत्त्वाची असलेली मुक्कामी एसटी बससेवा अखेर पुन्हा सुरू करण्यात आली आहे. समाजसेवक अनंत महादू घाणे यांच्या सातत्यपूर्ण पाठपुरावा आणि मागणीला यश मिळाल्याने आदिवासी भागातील नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे. आदिवासी हृदयसम्राट कै. मधुकरराव पिचड यांनी जनसेवेसाठी सुरू केलेली ही बससेवा काही तांत्रिक कारणांमुळे बंद करण्यात आली होती. त्यामुळे शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थी, रुग्ण, वयोवृद्ध, महिला, गरोदर माता तसेच सर्वसामान्य ग्रामस्थांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता. शासकीय कार्यालयीन कामे, उपचारासाठी प्रवास तसेच पर्यटनासाठी येणाऱ्या पर्यटकांनाही याचा फटका बसत होता. या गंभीर प्रश्नाची दखल घेत समाजसेवक अनंत महादू घाणे यांनी अकोले आगार व्यवस्थापक सुरेशराव दराडे तसेच संबंधित अधिकाऱ्यांची भेट घेत ग्रामस्थांच्या वतीने निवेदन सादर केले. आदिवासी भागातील नागरिकांच्या दैनंदिन प्रवासाचा प्रश्न लक्षात घेऊन रतनवाडी आणि साम्रद मुक्कामी बससेवा कायमस्वरूपी सुरू करण्याची आग्रही मागणी करण्यात आली. या प्रयत्नांना यश मिळत साम्रद मुक्कामी बससेवा तात्काळ सुरू करण्यात आली असून रतनवाडी मुक्कामी बससेवाही पुन्हा सुरू झाली आहे. नव्या वेळापत्रकानुसार संगमनेर येथून दुपारी ३.३० वाजता बस सुटून राजूर येथे सायंकाळी ५ वाजता, शेंडी येथे ५.३० वाजता तर रतनवाडी येथे सायंकाळी ६.३० वाजता पोहोचणार आहे. सकाळी मुक्कामाच्या ठिकाणावरून ६.३० वाजता बस सुटून संगमनेर येथे सकाळी ९.३० वाजता पोहोचणार आहे. याशिवाय प्रवाशांची वाढती गरज लक्षात घेऊन १५ जून २०२६ पासून राजूर–शेंडी–भंडारदरा फाटा–रतनवाडी–घाटघर मार्गे नवी दुपारची बससेवाही सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या नव्या बससेवेचा दुर्गम भागातील नागरिकांना मोठा फायदा होणार आहे. या महत्त्वपूर्ण निर्णयानंतर आगार व्यवस्थापक सुरेशराव दराडे, वाहतूक नियंत्रक देशमुख आर.टी., खाडे डी.व्ही. तसेच बाळासाहेब गंबीरे यांचा समाजसेवक अनंत महादू घाणे आणि ग्रामस्थांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. दरम्यान, रतनवाडी-साम्रद बससेवा पुन्हा सुरू झाल्याने ग्रामस्थांनी आनंद व्यक्त करत एसटी बसचे पूजन केले. तसेच एसटी महामंडळ आणि समाजसेवक अनंत घाणे यांचे आभार मानत आनंदोत्सव साजरा करण्यात आला. अनेक दिवसांपासून प्रलंबित असलेला प्रवाशांचा प्रश्न मार्गी लागल्याने नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.



# घनकचरा व्यवस्थापन २०२६चे काटेकोर पालन करावे -

ठाणे : (स. गांवकरी)

केंद्र सरकारच्या जलशक्ती मंत्रालयांतर्गत पेयजल व स्वच्छता विभागामार्फत ग्रामीण भागासाठी “घनकचरा व्यवस्थापन नियम २०२६” लागू करण्यात आले असून, हे नियम दि. १ एप्रिल २०२६ पासून संपूर्ण देशात अंमलात आले आहेत. या नियमांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी जिल्हा प्रशासन, जिल्हा परिषद तसेच ग्रामपंचायत स्तरावर विविध उपाययोजना राबविण्यात येत असून, नियमांचे काटेकोर पालन करण्याचे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी केले आहे. दि. २२ मे, २०२६ रोजी आयोजित ऑनलाईन आढावा बैठकीत जिल्हाधिकारी डॉ. पांचाळ यांनी ग्रामीण भागात स्वच्छता व्यवस्थापन अधिक सक्षम करण्यासाठी घनकचऱ्याचे वर्गीकरण, कचरा संकलन, प्रक्रिया व विल्हेवाट याबाबत प्रभावी नियोजन करण्याच्या सूचना दिल्या. यावेळी गावपातळीवर स्वच्छता व्यवस्थापन मजबूत करण्यासाठी संबंधित अधिकारी, कर्मचारी तसेच ग्रामस्थांनी सक्रिय सहभाग घेण्याची आवश्यकता त्यांनी अधोरेखित केली. बैठकीस उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) अविनाश फडतरे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) प्रमोद काळे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (स्वच्छ भारत मिशन) पंडित राठोड तसेच विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.



# वारकरी बालसंस्कार शिबिराची किर्तन सोहळयाने सांगता

नेवासा : (स. गांवकरी)

- वेदांताचार्य देविदास महाराजांनी वद्य वारीला दर्शनाला येण्यासाठी केले आवाहन



तीर्थक्षेत्र नेवासा येथील श्री संत ज्ञानेश्वर महाराज संस्थानच्या वतीने उन्हाळयाच्या सुट्टीनिमित्त संत ज्ञानेश्वर महाराज पैस खांब मंदिरात आयोजित केलेल्या पंधरा दिवशीय वारकरी बाल संस्कार शिबिराची वेदांताचार्य हभप देविदासजी महाराज म्हस्के शास्त्री यांच्या किर्तनाने भक्तिमय वातावरणात सांगता करण्यात आली.यावेळी वेदांताचार्य देविदास महाराजांनी वद्य वारीला दर्शनाला येण्यासाठी व वारीचे वैभव वाढविण्याचे आवाहन उपस्थित भाविक व विद्यार्थी पालकांना केले संत ज्ञानेश्वर महाराज संस्थानचे मार्गदर्शक वेदांताचार्य हभप देविदासजी महाराज म्हस्के शास्त्री यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या शिबिरातील मुलांना अमूल्य मार्गदर्शन करण्यात आले.शिबिरात सकाळी साडेपाच वाजता हनुमान चालीसा पठण कार्यक्रम,पहाटे सहा वाजता आरती झाल्यानंतर संतसेवक आदिनाथ महाराज पांगरे व संतसेवक दामोदर पवार यांनी मुलांकडून योगासने करून घेतली

संत ज्ञानेश्वर महाराज संस्थानचे विश्वस्त व मार्गदर्शक गुरुवर्य वेदांताचार्य देविदासजी महाराज म्हस्के शास्त्री यांनी बाल वारकऱ्यांचा गीता पाठ घेतला तर उपस्थित महाराज मंडळींनी वेगवेगळ्या अभंग ओवी पाठ करून घेतल्या.यामध्ये गहिनीनाथ महाराज आढाव,हरी महाराज भोगे यांनी देखील प्रशिक्षण देण्यासाठी मोलाचे योगदान दिले दुपारच्या सत्रात मुलांकडून वेगवेगळे खेळ गप्पागोष्टी असे विरंगुळा प्राप्त करणारे कार्यक्रम घेण्यात आले.दोन तास विश्रांती नंतर संत ज्ञानेश्वर महाराज संस्थानचे विश्वस्त गायनाचार्य ज्ञानदेव माऊली शिंदे यांनी मुलांना मार्गदर्शन करून अभंग गायनाच्या संदर्भात मार्गदर्शन केले,उपस्थित मृदुंगाचार्य महाराज मंडळीच्या मार्फत मृदंगाचे प्रशिक्षण देण्यात आले

बाल वारकऱ्यांना विविध अभंगासह भजन शिकविण्यात आले, सायंकाळी ५ वाजता सामुदायिक हरिपाठ ,सायंकाळी ७ वाजता शिबिरातील सर्व बालवारकऱ्यांना सायंकाळचे भोजन नित्यनेमाने दिले गेले,सकाळी श्रीमद भगवत गीतेची तसेच रात्री वेगवेगळ्या स्तोत्रांची संथा गुरुवर्य देविदासजी महाराज म्हस्के यांनी दिली. निशुल्क आयोजित केलेल्या बाल संस्कार शिबिरात बाल वारकऱ्यांनी वारकरी संप्रदायातील मृदुंग वादन, हार्मोनियम वादन, गायन आदी प्रशिक्षण घेतले

वारकरी संप्रदायातील गायन वादन क्षेत्रात विशारद असलेली महाराज मंडळीनी शिबिराला भेट देऊन निशुल्क प्रशिक्षण देण्याचे काम केले.निशुल्क शिबीर संस्थान वतीने घेतल्याने सुरू अनेक अन्नदात्यांनी बाल वारकऱ्यांना अन्नदान करण्यासाठी पुढे येऊन अन्नदान केले.वारकरी संप्रदायात मानव हीच जात आणि मानवता हाच धर्म ही शिकवण संत मंडळीची असल्याने वारकरी संप्रदायाचे उगमस्थान असलेल्या संत ज्ञानेश्वर माऊलींच्या कर्मभूमीत झालेल्या निशुल्क वारकरी बाल संस्कार शिबिरामध्ये ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचा सहभाग मोलाचा ठरला.

वारकरी बाल संस्कार शिबिराच्या सांगता प्रसंगी संत ज्ञानेश्वर महाराज संस्थानचे विश्वस्त व मार्गदर्शक हभप वेदांताचार्य श्री देविदासजी महाराज म्हस्के शास्त्री यांचे किर्तन झाले.सर्वांनी मिष्टान्न महाप्रसादाचे वाटप करण्यात येऊन शिबीराची सांगता करण्यात आली. शिबिर यशस्वीपणे पार पाडण्यासाठी विश्वस्त मंडळाचे अध्यक्ष पांडुरंग अभंग व सर्व विश्वस्त मंडळींनी केलेले उत्कृष्ट नियोजन मोलाचे ठरले संत ज्ञानेश्वर महाराज भक्त परिवाराच्या वतीने संत ज्ञानेश्वर महाराज संस्थानने निशुल्क शिबीर घेऊन ते यशस्वीपणे पार पाडल्याबद्दल अध्यक्ष व विश्वस्त मंडळींना धन्यवाद देत आभार मानले.

# समाजसेवक नानजीभाई ठक्कर व डॉ. विश्वासराव आरोटे यांचा डुंबरवाडीत सन्मान

## गुरुचरित्र पारायण सोहळा उत्साहात संपन्न!

**ओतूर : (स. गांवकरी)**

श्री स्वामी समर्थ भक्ती शक्ती मंदिर, डुंबरवाडी येथे ह.भ.प. चंद्रकांत महाराज डुंबरे सेवा संस्थेच्या वतीने अधिकमासानिमित्त आयोजित एकदिवसीय गुरुचरित्र पारायण कार्यक्रम भक्तिमय वातावरणात आणि उत्साहात संपन्न झाला.

या कार्यक्रमाला समाजसेवक श्री नानजीभाई खिमजीभाई ठक्कर ठाणावाला, दैनिक समर्थ गांवकरीचे संपादक डॉ. विश्वासराव आरोटे, ह.भ.प. चंद्रकांत महाराज डुंबरे, सौ. नयना डुंबरे यांच्यासह मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते. तसेच सौ. सुशीला डुंबरे, सौ. सुजाता गाडेकर, श्री अशोक डोके आणि सौ. प्रियंका हडवळे यांनीही कार्यक्रमात सहभाग नोंदविला. यावेळी समाजसेवक श्री नानजीभाई ठक्कर यांनी आपल्या भाषणातून गुरुचरित्र पारायणाचे महत्त्व अधोरेखित करत समाजात एकोपा, अध्यात्म आणि संस्कारांची गरज व्यक्त केली. अधिकमास हा धार्मिक आणि आध्यात्मिक साधनेसाठी अत्यंत पवित्र काळ असून अशा उपक्रमांमुळे समाजात सकारात्मक ऊर्जा निर्माण होत असल्याचे त्यांनी सांगितले.

तसेच युवकांनी संस्कृती, परंपरा आणि सामाजिक कार्यात सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन करत शिक्षणाचे महत्त्वही त्यांनी अधोरेखित केले. विद्यार्थ्यांनी शिक्षणाकडे विशेष लक्ष देऊन प्रगती साधावी तसेच समाजाच्या विकासासाठी शिक्षण हे प्रभावी माध्यम असल्याचे त्यांनी नमूद केले. मंदिर परिसरातील सभागृहास धनलक्ष्मीबेन नानजीभाई ठक्कर आणि श्रीमती नयना चंद्रकांत डुंबरे यांचे नाव देण्यात येणार असल्याची माहिती यावेळी देण्यात आली. संस्थेच्या कार्याचा आढावा घेताना हजारो सभासदांच्या माध्यमातून अनेक लोकांना स्वतःच्या पायावर उभे राहण्यासाठी, व्यवसाय सुरू करण्यासाठी तसेच रिक्षा खरेदीसाठी कर्जपुरवठा करण्यात आल्याची माहिती देण्यात आली. सुमारे ५०० ते ६०० रिक्षांसाठी कर्ज देण्यात आले असून संस्थेच्या शाखेला 'अ' वर्ग प्राप्त झाल्याचे श्री चंद्रकांत डुंबरे यांनी सांगितले.



यावेळी डॉ. विश्वासराव आरोटे यांनी संस्थेच्या कार्याचे कौतुक करत संस्थेची प्रगती उल्लेखनीय असल्याचे सांगितले. नानजीभाई ठककर यांच्या मार्गदर्शन व आशीर्वादामुळे संस्थेला बळ मिळाल्याचे त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमादरम्यान डॉ. विश्वासराव आरोटे व श्री नानजीभाई ठक्कर यांचा श्री चंद्रकांत डुंबरे व सौ. नयनाताई डुंबरे यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

तसेच उपस्थितांसाठी भोजन व्यवस्थेचा लाभ डॉ. विश्वासराव आरोटे यांच्या वतीने देण्यात आला.

कार्यक्रमाच्या समारोपप्रसंगी श्री चंद्रकांत डुंबरे व सौ. नयनाताई डुंबरे यांनी उपस्थित मान्यवर, ग्रामस्थ तसेच समाजसेवक श्री नानजीभाई ठक्कर यांचे आभार मानले. धार्मिक व सामाजिक कार्यासाठी मिळालेल्या सहकार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करत भविष्यातही अशा उपक्रमांना सर्वांनी सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले.

## थोडक्यात बातम्या...



### कल्याणमध्ये ३४ कोटींचे हेरॉईन जप्त; मुख्य पुरवठादारासह ५ जणांना अटक

ठाणे **(स. गांवकरी)** : पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ०३, कल्याण यांच्या अंमली पदार्थ विरोधी कारवाई पथकाने मोठी कारवाई करत तब्बल ९ किलो ७६८ ग्रॅम वजनाचा आणि ३४ कोटी १८ लाख ८४ हजार रुपये किमतीचा हेरॉईनचा साठा जप्त केला आहे. या प्रकरणी मुख्य पुरवठादारासह एकूण ५ आरोपींना अटक करण्यात आली आहे. कल्याण डोंबिवली आणि इतर ठिकाणी केलेल्या कारवाईत मोठ्या प्रमाणात माल जप्त झाल्याने अंमली पदार्थ विक्री व्यापार करणाऱ्यांचे यांचे धाबे दणाणले आहेत. दिनांक ०१/०४/२०२६ रोजी पोलीस उप आयुक्त, परि. ०३ यांच्या आदेशान्वये सपोनि अनिल गायकवाड, ग्रेड पोलीस उप निरीक्षक जितेंद्र ठोके यांचे पथक महात्मा फुले चौक पोलीस ठाणे हद्दीत गस्तीवर होते. सकाळी ७:२० वाजता स्मशानभूमीजवळ, सांगळेवाडीकडे जाणाऱ्या रोडवर दोन संशयित इसम पाठीवर बॅग घेऊन आढळले. पोलिसांना पाहून पळून जाण्याचा प्रयत्न करणाऱ्या दोघांना जागीच ताब्यात घेण्यात आले. यावेळी अतिरिक्त पोलीस आयुक्त संजय जाधव उपायुक्त अतुल झेंडे, सहाय्यक आयुक्त अशोक होनमाणे, महात्मा फुले चौक पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक बळीराम सिंग परदेशी आणि पथकाने पत्रकार परिषदेत उपस्थित राहून माहिती दिली. अटक आरोपींची नावे १. कासिम अब्दुल सत्तार वसईकर (३८), रा. बजाज हाऊस, शहापूर, जि. ठाणे व २. कृष्णा नागप्पा हळेमणी (३६), रा. प्रतीक्षा नगर, सायन कोळीवाडा, मुंबई पंचांसमक्ष घेतलेल्या झडतीत दोघांकडून मोठ्या प्रमाणात हेरॉईन जप्त करण्यात आले. याप्रकरणी पो.शि. अमित शिंदे यांच्या फिर्यादीवरून महात्मा फुले चौक पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला.

### उन्हाच्या झळा अन् उकाड्याची धग आजपर्यंत कायम नागरिक हैराण

मुदखेड **(स. गांवकरी)** : शहरात गेल्या काही दिवसापा-सून ४० ते ४२ अंश तापमानामुळे नागरिक हैराण झाले होते. मात्र, दोन दिवसांपासून वातावरणात झालेल्या बदलामुळे सायंकाळी ढगाळ वातावरणामुळे उष्णतेचे तीव्रता काहीशी कमी झाली आहे. नारळपाणी यांचा आधार घेत आहेत. सायंकाळी ढगाळ वातावरणामुळे पावसाची शक्यता निर्माण झाली असली, तरी अद्याप जोरदार पाऊस सकाळपासूनच उन्हांचा तडाका झालेला नाही. हवामानात सतत बदल जाणवायला सुरुवात झाली. मात्र, होत असल्याने आवश्यक ती काळजी उष्णता वाढल्याने हवेत प्रचंड उकाडा घेण्याचे आवाहन करण्यात येत आहे. जाणवत आहे. परिणामी घामाच्या डॉक्टरांच्या मते, उष्ण वातावरणात धारा लागून अस्वस्थता वाढत आहे. शरीरातील पाण्याचे प्रमाण कमी होऊ विशेषतः दुपारच्या वेळेत घराबाहेर नये यासाठी पुरेसे पाणी पिणे, हलका पडणाऱ्या नागरिकांना दमट हवेमुळे आहार घेणे आणि उन्हात अनावश्यक बाहेर पडणे टाळणे गरजेचे आहे. उकाड्याच्या धगीमुळे अजूनही नागरिक त्रस्त आहेत. त्रास सहन करावा लागत आहे. अनेक ठिकाणी नागरिक थंड पेये, - उसाचा रस, लिंबू सरबत, उष्ण दमट वातावरणामुळे वाफांचा मारा दरम्यान सूर्य मावळल्या नंतरही घरात आणि बाहेर वातावरणात उष्णता कायम राहत आहे. बाहेरचे वातावरण रात्रीच्यावेळी थंड होत असले तरी घरातले वातावरण मात्र असह्य होवू लागले आहे. उकाडा आणि उष्णता ठ्यिा प्रमाणात होत आहे.

## शुभम मोहन मुंढे यांची महसूल सहाय्यक पदी निवड

### गावाने वाजत गाजत काढली मिरवणूक, आमदारांच्या हस्ते झाला सन्मान



**अकोले : (स. गांवकरी)**

अकोले तालुक्यातील दुर्गम आदिवासी टिटवी सारख्या गावातील शुभम मोहनराव मुंढे यांची महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या मार्फत घेण्यात आलेल्या परीक्षेतून मंत्रालयीन महसूल सहाय्यक पदावर निवड झाली. या आनंद प्रित्यर्थ गावाने डी. जे. तालावर मिरवणूक काढली शुभम चा सन्मान तालुक्याचे आमदार डॉ किरण लहामटे यांच्या हस्ते करण्यात आला. अकोले तालुक्यातील दुर्गम आदिवासी भागातील टिटवी येथील शुभम मुंढे याने कोणतेही प्रकारची शिकवणी न लावता हे पहिल्याच प्रयत्नात यश मिळवले आहे. त्याचे प्राथमिक शिक्षण राजूर जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत तर बारावी पर्यंत चे नवोदय विद्यालय टाकळी ढोकेश्वर येथे झाले. मॅकेनिकल अभियांत्रिकी पदवी सह एम. बी. ए. चे शिक्षण पुण्यात पूर्ण केले आहे. भाजपचे माजी तालुकाध्यक्ष मोहन मुंढे यांचे चिरंजीव असून आई पुष्पा मुंढे या गृहिणी आहेत.

टिटवी येथे आयोजित कार्यक्रमाचे अध्यक्ष भाजपा जिल्हा सरचिटणीस सिताराम भांगरे हे होते. यावेळी भाजपा जिल्हा सोशल मिडिया सेल जिल्हा संयोजक भाऊसाहेब वाकचौरे, मच्छिंद्र मंडलिक, रमेश राक्षे, धनंजय संत, रासपचे भगवान करवर, बाळासाहेब साबळे आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन युवराज तळपे यांनी तर शेवटी आभार मोहनराव मुंढे यांनी मानले.

> आदिवासी समाजातील मुले प्रतिकूल परिस्थितीत शिक्षण घेऊन यश संपादन करीत आहे ही भूषणावह गोष्ट आहे.
>
> **-आमदार डॉ किरण लहामटे**
>
> मोहन मुंढे सामाजिक चळवळीत कार्य करताना गोरगरीब आदिवासी समाजाला न्याय देण्याचे कार्य केले त्याचे फलित आहे. शुभम ने नोकरीच्या माध्यमातून वडिलांच्या सामाजिक बांधिलकीचा वारसा पुढे न्यावा
>
> **- सिताराम भांगरे**

## माजी नगराध्यक्षासह आठ जणांवर जुगार प्रकरणी गुन्हा दाखल

**हिमायतनगर : (स. गांवकरी)**

- एलसीबी व हिमायतनगर पोलिसांची पळसपूर रोडवरील जुगार अड्ड्यावर धडक कारवाई
- १ लाख २७ हजार ६०० रुपयांचा मुद्देमाल जप्त

शहरातील पळसपूर रोड परिसरातील एका शेताच्या आखाड्यात सुरू असलेल्या अवैध जुगार अड्ड्यावर स्थानिक गुन्हे शाखा (एलसीबी) व हिमायतनगर पोलिसांनी संयुक्त धाड टाकत मोठी कारवाई केली. या कारवाईत हिमायतनगरचे माजी नगराध्यक्षांसह आठ जणांविरुद्ध महाराष्ट्र जुगार कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांनी रोख रक्कम, दोन स्कुट्या व जुगाराचे साहित्य असा एकूण १ लाख २७ हजार ६०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, पळसपूर रोडलगत असलेल्या एका शेतामध्ये रात्री उशिरापर्यंत अवैध जुगार सुरू असल्याची गोपनीय माहिती पोलिसांना प्राप्त झाली होती. त्यानंतर पोलीस अधीक्षक अबीनाश कुमार यांच्या मार्गदर्शनाखाली एलसीबी पथक व हिमायतनगर पोलीस स्टेशनच्या अधिकाऱ्यांनी संयुक्त सापळा रचून पहाटे साधारण दोन वाजताच्या सुमारास संबंधित ठिकाणी धाड टाकली. अचानक झालेल्या पोलिस कारवाईमुळे जुगार खेळणाऱ्यांमध्ये एकच गोंधळ उडाला. पोलिसांनी घटनास्थळावरून आठ जणांना ताब्यात घेत त्यांच्याविरुद्ध कारवाई केली. या वेळी आरोपींकडून ८२ हजार ६०० रुपयांची रोख रक्कम, अंदाजे ८५ हजार रुपये किमतीच्या दोन स्कुट्या तसेच पत्त्यांचे संच व इतर साहित्य जप्त करण्यात आले.

## विठ्ठलराव वरुडे पाटील यांना समाज भूषण' पुरस्कार प्रदान



**पुणे : (स. गांवकरी)**

रुग्णसेवा आणि ज्येष्ठ नागरिकांच्या आरोग्यासाठी सातत्याने समर्पित भावनेने कार्य करणारे माय माउली केअर सेंटर व लायन्स क्लब ऑफ पुणे कात्रजचे संस्थापक अध्यक्ष विठ्ठलराव वरुडे पाटील यांना 'आदर्श समाजसेवक' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. प्रिंट व डिजिटल मीडिया पत्रकार संघ खेड तालुका च्या वतीने ' हा सोहळा जाक माता गार्डन मंगल कार्यालय शिरोली तालुका खेड जिल्हा पुणे येथे उत्साहात संपन्न झाला. या सोहळ्याला राजकीय आणि सामाजिक क्षेत्रातील अनेक दिग्गज मंडळी उपस्थित होते. यामध्ये प्रमुख उपस्थिती समाजरत्न,उद्योगरत्न, समाज भूषण,दानशूर,व्यक्तिमत्व एन के टी चे ट्रस्टचे अध्यक्ष शेठ नानजीभाई ठक्कर ठाणावाला. शिवसेना पुणे जिल्हा महिला आघाडी अध्यक्षा उबाठा यांचा समावेश होता. या मान्यवरांच्या हस्ते वरुडे पाटील यांना गौरवण्यात आले.

संस्थेचे अध्यक्ष मनोहर गोरगल्ल यांनी व शेठ नानजीभाई ठक्कर ठाणावाला यांनी आपल्या मनोगतात विठ्ठलराव वरुडे पाटील यांच्या कार्याचा आढावा घेतला व म्हणाले गेल्या १५ वर्षांपासून वरुडे पाटील यांनी रुग्णसेवेच्या क्षेत्रात, विशेषतः वृद्धांच्या आरोग्यासाठी जे अखंड कार्य केले आहे, त्याचे त्यांनी विशेष कौतुक केले. याप्रसंगी विविध क्षेत्रांतील पुरस्कारार्थी, सामाजिक, राजकीय आणि शैक्षणिक क्षेत्रातील कार्यकर्त्यांचाही सन्मान करण्यात आला.

## उंचखडक बु शाळेचे विद्यार्थी शिष्यवृत्ती परिक्षेत यशस्वी

**अकोले : (स. गांवकरी)**


मागिल वर्षी इयत्ता पाचवीचा वर्ग सुरु केला आणि प्रत्येक स्पर्धा परिक्षेत या शाळेने उतुंग भरारी घेतली. नवोदय विद्यालय, सैनिकी स्कुल, लक्षवेध, गणित-विज्ञान, सावित्रीबाई फुले, अशा विविध स्पर्धांमधून विद्यार्थ्यांनी शाळेचे नाव जिल्हा पातळीवर झळकविले. आता नुकताच शिष्यवृत्तीचा निकाल लागला, यात जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे 15 विद्यार्थी यशस्वी ठरले आहेत. त्यामुळे, तीन वर्षापुर्वी बंद पडलेली शाळा आज राज्याच्या पटलावर गुणवत्तेच्या दृष्टीकोणातून जात आहे. या गोष्टीचे जिल्हा शिक्षणाधिकारी भास्कर पाटील यांनी कौतुक केले आहे. तसेच गोविंद खोकले, रवि रुपवते, विक्रम गायकर, काळु तपासे आणि शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष ॲड. सागर शिंदे यांचे कौतुक केले आहे. तर यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे. इयत्ता पाचवीच्या शिष्यवृत्ती परीक्षेचा निकाल नुकताच ऑनलाईन जाहीर करण्यात आला आहे. त्यात जिल्हा परिषद प्रा. शाळा उंचखडक बु येथील 15 विद्यार्थी यशस्वी झाले आहेत. त्यात विराज बडे, निशिता बोराडे, वाकचौरे विराज, पवार ईश्वरी, शौर्य काकड, शिंदे स्वरा, खोकले सोहम, ईशिता बोराडे, शौर्यजीत वाकचौरे, नेहा मधे, सार्थकी सोनवणे, ईश्वरी कोरडे, सार्थक लहामटे, सुदर्शन म्हस्के, सानिध्य भोयर या विद्यार्थ्यांनी यश संपादन केले आहे. यातील निशिता बोऱ्हाडे आणि स्वरा शिंदे या दोन विद्यार्थीनी नवोदय विद्यालयास पात्र ठरल्या असून 18 विद्यार्थ्यी उत्तीर्ण झाले होते. तसेच सोहम खोकले आणि इशिता बोऱ्हाडे हे दोन विद्यार्थी सौनिकी स्कुलसाठी पात्र ठरले आहेत. हे यश फक्त एक वर्षातील असून यासाठी गोविंदे खोकले आणि बडे मॅडम यांनी गुणवत्ता कायम ठेवण्याचे काम केले आहे. खरंतर शासनाच्या शैक्षणिक उदासिन धोरणामुळे विद्यार्थ्यांना शिक्षक मिळु शकले नाहीत. तरी सुद्धा शाळा व्यवस्थापन समितीने एम ए झालेल्या बडे मॅडम यांची खाजगी शिक्षक म्हणून मानधन तत्वावर नियुक्ती केली आणि त्यांनी विद्यार्थ्यांना सर्वोत्तम पद्धतीने शिकविण्याचे काम केले. त्याच्या प्रयत्नाचे देखील हे फळ आहे. मात्र या यशात गोविंद खोकले यांचा सिंहाचा वाटा आहे. तसेच गटशिक्षण अधिकरी बाळासाहेब दोर्गे, रवि रुपवते, विक्रम गायकर, काळु तपासे तत्कालिन गटशिक्षणाधिकारी आरविंद कुमावत, केंद्रप्रमुख सुनिल नरसाळे सर यांचे सर्वेत्तम मोलाचे सहकार्य लाभले आहे अशी माहिती शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष ॲड. सागर शिंदे यांनी दिली.




## काजवा महोत्सव म्हणजे अकोले तालुक्यातील निसर्ग सौंदर्याचा मानबिंदू

**(स. गांवकरी)**

सह्याद्रीच्या कुशीत भंडारदराच्या निसर्गरम्य अरण्यात पावसाच्या पहिल्या सरी आधी एक अद्भुत काजव्यांची जादुई दुनिया साकारते. रात्रीच्या शांत अंधारात असंख्य हजारो काजवे आपल्या शरीरातील प्रकाश पेटवतात, तो फक्त एकाचं कारणासाठी प्रेम व्यक्त करण्यासाठी आपल्या जोडीदाराला आकर्षित करण्यासाठी. प्रत्येक लुकलुकणारा प्रकाश म्हणजे एक हाक आहे. एक संदेश आहे, एक प्रेमकथा आहे, जी शब्दांशिवाय सांगितली जाते. माणूस वास्तविक जीवनात कृत्रिम प्रकाशात जगतो, पण काजवे आपल्याला स्वयंप्रकाशीत होऊन जगण्याची कला शिकवतात. हीच कला अनुभवण्यासाठी, आणि हेच



निसर्गाचं अद्भुत रहस्य जाणून घेण्यासाठी, निसर्गाची जिवंत रोशनी स्वतःच्या डोळ्यात साठवण्यासाठी,

"महाराष्ट्राची चेरापुंजी" म्हणून ओळखल्या जाणाऱ्या आमच्या अकोले तालुक्यातील भंडारदरा, घाटघर, कळसुबाई या ठिकाणी पर्यटक मोठ्या प्रमाणावर या काजवा महोत्सवाचे साक्षीदार होण्यासाठी येत आहे. अकोले तालुक्यातील भंडारदरा परिसरात पुन्हा एकदा निसर्गाची जादू सुरू झाली. काजव्यांचे आगमन सुरू झाले असून, येत्या काही दिवसात येथे अक्षरशः प्रकाशाची मायावी दुनिया बघायला मिळणार आहे. सध्या भंडारदरा पानलोट क्षेत्राच्या परिसरात काजवे दिसायला सुरुवात झाली आहे. हे प्रमाण दिवसेंदिवस वाढणार देखील आहे. आणि येथील संपूर्ण परिसर उजळून निघणार आहे. वळवाच्या पावसामुळे सह्याद्रीच्या दऱ्या -खोऱ्यात काजव्यांच्या मिलनाचा उत्सव सुरू झाला आहे, जोडीदाराला आकर्षित करण्यासाठी हे काजवे लुकलुकताना दिसतात.

आणि याच वेळी हा अद्भुत निसर्गाचा चमत्कार अनुभवण्यासाठी पर्यटकांची गर्दी वाढू लागते. दरवर्षी मे महिन्याच्या शेवटी आणि जून महिन्याच्या सुरुवातीला हा काजव्यांचा हंगाम मानला जातो. याच काळात भंडारदरा, घाटघर, कळसुबाईच्या पायथ्याशी असणाऱ्या आदिवासी भागांत हा अनोखा देखावा बघायला मिळतो. विशेष म्हणजे आदिवासी बांधवांच्या मते काजव्यांचे आगमन म्हणजे लवकरच मान्सून येण्याचे संकेत मानले जातात, त्यामुळे या भागात शेती कामालाही वेग आलेला दिसतो आहे. सुंदर महाकाय जलाशय, घनदाट जंगले, आकाशाला भिडलेले उंच-उंच डोंगर, आणि नजर अपुरी पडेल इतक्या खोलच खोल दऱ्या. जैवविविधतेने नटलेला हा अकोले तालुक्याचा परिसर जणू पृथ्वीवरील स्वर्गच आहे. अशा प्रकारचा भास या निसर्गरम्य वातावरणात आल्यावर होत असतो. या परिसरात सध्या लगबग सुरू आहे ती म्हणजे वर्षातून एकदाच येणाऱ्या काजवा महोत्सवाची. काजवे या परिसरात आता चमकू लागले आहे, आणि रात्री या लुकलुकणाऱ्या काजव्यांची प्रणयनृत्य बघण्यासाठी पर्यटकांची मोठ्या प्रमाणावर गर्दी सुरू झाली आहे. परंतु आपण देखील काजवा महोत्सवाला जाताय तर तेथील नैसर्गिक जैवविविधतेचा ऱ्हास न होता, आपली स्वतःची नैसर्गिक जैवविविधतेच्या संवर्धनाची भूमिका एक जबाबदार नागरिक म्हणून बाहेरील पर्यटकांना दिसली पाहिजे. इतक्या सुंदर नैसर्गिक घटनेला आपण महोत्सवाचे स्वरूप देतो, तेव्हा त्याचे मोठ्या प्रमाणात दुष्परिणाम देखील होतात. तर काजवा हा बीटल समूहातील एक किडा आहे. तो आपल्या मादीला आकर्षित करण्यासाठी चमकत असतो, उन्हाळ्याच्या शेवटी आणि पाऊस पडण्याच्या अगोदर काजवे प्रजनन करतात, याची मादी जमिनीवर असते आणि नर हवेत किंवा झाडांवर बसून प्रकाशाच्या माध्यमातून संदेश देत असतात. प्रत्येक प्रजातीची चमकण्याची वारंवारता,लय वेगळी असते.आणि मादी त्यावरूनच आपल्या प्रजातीचा नर बरोबर ओळखते. प्रजनन झाल्यावर मादी जमिनीवर अंडी देते, आणि ज्या अळ्या असतात त्या जंगलातील जो पालापाचोळा असतो त्यावर फीड करतात. हे काजवा प्रजातीचे संपूर्ण जीवन चक्र आहे.

निसर्गातील सर्वात कार्यक्षम
व सकारात्मक प्रकाशांपैकी
हा एक मानला जातो.

नागरिक म्हणून आपली जबाबदारी :
निसर्ग शांत ठेवावा, कुठल्याही
प्रकारचे साऊंड,डी.जे
स्पीकर,संगीत इ.आवाजाची
उपकरणे वापरून ध्वनी
प्रदूषण करू नये.
* LED तसेच तीव्र प्रकाशाचा
वापर करू नये.
* सुरक्षित अंतरावरून
निरीक्षण करावं.
* फ्लॅश लावून फोटो काढू नयेत.
* काजवे हातात पकडू नये.
काजव्यांना पहा...
पण त्यांचा संसार बिघडवू नका..!
जेणेकरून आपल्या पुढील
पिढ्यांना हा "काजवा महोत्सव"
आपल्याला दाखवता येईल,
अन्यथा त्यांना कृत्रिम प्रकाशाचे
काजवे बघायला लागतील
या गोष्टींची आपण कटाक्षाने
काळजी घ्यायला पाहिजे.

### काजवे चमकतात कसे ?

- काजव्यांच्या शरीरात "ल्युसिफेरिन" नावाचं नैसर्गिक रसायन असतं.
- ऑक्सिजन सोबत अभिक्रिया झाल्यावर प्रकाश निर्माण होतो.
- या प्रक्रियेला "बायोल्युमिनेसन्स" म्हणतात.
- या प्रकाशात उष्णता नसते.
- काजव्यांचा प्रकाश जवळपास पूर्णपणे "थंड प्रकाश" असतो.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ४०६, व्यंकटेश विश्व, अभिरूची परिसर समोर, पारे कंपनी रोड, नऱ्हे, पुणे – ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : A-1, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)

आंतरभारती रुरल इंटरनॅशनल मेडिकल एज्युकेशन ट्रस्ट संचलित,

# आनंदगड शैक्षणिक संकुल

## आनंदगड, वीरगाव ता. अकोले, जि. अहिल्यानगर



रौप्यमहोत्सवी वर्ष
वर्ष १९९९-२०२४

पाल्याच्या उज्वल भविष्यासाठी **आनंदगड शैक्षणिक संकुल** येथे स्वप्न प्रत्यक्षात साकारले जातात!

(D.T.E., MSBTE, DBAT University P.C.I. Approved)

DTE Code **5480**

## मातोश्री राधा कॉलेज ऑफ फार्मसी

| | डी फार्मसी | बी फार्मसी |
|---|---|---|
| पात्रता | १२ वी पास (PCB / PCM) | १२ वी पास (PCB / PCM & CET) |
| कालावधी | २ वर्ष | ४ वर्ष |
| प्र.क्षमता | ६० विद्यार्थी | ६० विद्यार्थी |

विद्यार्थ्यांसाठी बस सुविधा उपलब्ध!

- संपर्क -
7709203202
9421190696 | 9689758321

ग्रामीण महाराष्ट्रातील ISO मानांकित शाळा

## धर्मवीर आनंद दिघे इंग्लिश मिडिअम स्कुल अँण्ड ज्युनिअर कॉलेज

के जी ते १२ वी विज्ञान शाखा
(इंग्रजी माध्यम)

अत्यल्प फी
सर्वोत्कृष्ठ शिक्षण



आपल्या पाल्याच्या शालेय प्रवेशासाठी संस्कारक्षम इंग्रजी माध्यमाची प्रयोगशील शाळा

- संपर्क -
9158077688
7875074070 | 9975276670

## आनंदगड पॉलिटेक्निक कॉलेज

पत्ता: आनंदगड शैक्षणिक संकुल, आनंदगड, वीरगांव, ता. अकोले, जि. अहिल्यानगर
DTE, Govt of Maharashtra M.S.B.T.E., Mumbai AICTE, New Delhi Approved

DTE Code 05662

- सिव्हिल इंजिनिअरिंग 60
- मॅकेनिकल इंजिनिअरिंग 60
- कॉम्प्युटर इंजिनिअरिंग 60
- इलेक्ट्रिकल अँण्ड इलेक्ट्रॉनिक्स 60
- आर्टिफिशीअल इंटेलिजीअंस अँण्ड मशीन लर्निंग 60

- संपर्क -
9209645837 | 9922545516
9765431168 | 7028724045 | 9922161686



महाराष्ट्र शासन वैद्यकिय शिक्षण व
औषधी द्रव्य विभाग महाराष्ट्र कौन्सिल ऑफ अँक्युपंक्चर,मुंबई
- मान्यता प्राप्त वैद्यकीय अभ्यासक्रम -

Anandgad Virgaon

## मातोश्री गंगुबाई शिंदे ॲक्यूपंक्चर कॉलेज अँण्ड हॉस्पिटल

डिप्लोमा इन ॲक्युपंक्चर थेरपी (DAT)

| | |
|---|---|
| प्रवेश क्षमता | ५० विद्यार्थी |
| डिप्लोमा कालावधी | २ वर्षे |
| शैक्षणिक पात्रता | इ. १२ वी पास |

सुविधा
- सर्व सुविधायुक्त भव्य कॉलेज व हॉस्पिटल इमारत
- तज्ञ व अनुभवी प्राध्यापक व अँक्युपंक्चरिस्ट
- अँक्युपंक्चर उपचार पद्धती सुविधा
- वसतिगृह सुविधा उपलब्ध

- संपर्क -
9011271729
9834719663 | 7028724045

॥ सुजाता ॥ अकोले 9970095289

## थोडक्यात पण महत्वाचे



### अहिल्यानगर जिल्हा आता बनतोय देशाचे नवे 'डिफेन्स मॅन्युफॅक्चरिंग हब!

अहिल्यानगर (स. गांवकरी) : अहिल्यानगर जिल्हा आता देशाच्या संरक्षण क्षेत्रातील नव्या औद्योगिक क्रांतीचा केंद्रबिंदू बनत असून, महाराष्ट्राच्या औद्योगिक प्रगतीला नवी दिशा देणारा डिफेन्स मॅन्युफॅक्चरिंगमधील ऐतिहासिक टप्पा शिर्डी MIDC परिसरात साकारला आहे. सुमारे २०० एकर क्षेत्रावर उभारलेला देशातील सर्वात मोठा खाजगी तोफगोळा निर्मिती प्रकल्प हा भारताच्या संरक्षण क्षेत्रातील आत्मनिर्भरतेच्या दिशेने टाकलेले अत्यंत महत्त्वपूर्ण पाऊल आहे. या अत्याधुनिक प्रकल्पामध्ये प्रतिवर्षी १५५ मिमी क्षमतेचे तब्बल ५ लाख तोफगोळे निर्मिती करण्याची क्षमता असून, देशाच्या संरक्षण सज्जतेला मोठे बळ मिळणार आहे. “मेक इन इंडिया” आणि “आत्मनिर्भर भारत” या पंतप्रधान आदरणीय श्री. नरेंद्रजी मोदी यांच्या दूरदृष्टीपूर्ण संकल्पनेला प्रत्यक्ष गती देणारा हा प्रकल्प संरक्षण उत्पादन क्षेत्रात भारताला अधिक सक्षम, स्वयंपूर्ण आणि जागतिक स्तरावर स्पर्धात्मक बनविणारा ठरेल. सुमारे ₹१००० कोटींची भव्य गुंतवणूक आणि जवळपास ५००० रोजगारनिर्मितीच्या संधीमुळे हा प्रकल्प स्थानिक युवकांसाठी विकासाचे नवे दालन उघडणार आहे. औद्योगिक विकास, तांत्रिक प्रगती, रोजगारनिर्मिती आणि राष्ट्रीय सुरक्षेला बळ देणारा हा प्रकल्प केवळ अहिल्यानगर जिल्ह्यासाठी नव्हे, तर संपूर्ण महाराष्ट्रासाठी अभिमानाची बाब ठरत आहे. अहिल्यानगर जिल्हा आता देशाचा नवा “डिफेन्स मॅन्युफॅक्चरिंग हब” म्हणून उदयास येत असून, विकसित आणि सक्षम भारताच्या निर्मितीत महत्त्वपूर्ण योगदान देण्यासाठी सज्ज झाला आहे.

### वाढलेल्या मागणीमुळे इंडियन ऑइलचे रविवारीही डेपो सुरू

मुंबई (स. गांवकरी) : महाराष्ट्रातील विविध भागांमध्ये इंधनाच्या मागणीत झालेल्या वाढीच्या पार्श्वभूमीवर इंडियनऑइलने रविवारीही आपल्या डेपो आणि टर्मिनलचे कामकाज सुरू ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. सामान्यतः साप्ताहिक सुट्टी असतानाही पेट्रोल, डिझेल आणि एलपीजीचा अखंडित पुरवठा सुनिश्चित करण्यासाठी ही विशेष व्यवस्था करण्यात आली आहे. इंडियनऑइलकडून देण्यात आलेल्या माहितीनुसार, महाराष्ट्रातील अकोला, चंद्रपूर, मनमाड, वाशी, मिरज, अहिल्यानगर आणि सोलापूर येथील डेपो व टर्मिनल रविवारी कार्यरत ठेवण्यात आले आहेत. वाढलेल्या मागणीला तातडीने प्रतिसाद देण्यासाठी लॉजिस्टिक्स आणि वितरण व्यवस्थेवर विशेष लक्ष केंद्रित करण्यात आले आहे. इंधन साठ्याची स्थिती सातत्याने तपासली जात असून पुरवठा पथके, वाहतूक नेटवर्क, टर्मिनल ऑपरेशन्स तसेच निवडक रिटेल आऊटलेट्स २४ तास कार्यरत ठेवण्यात आले आहेत. “We are always There” या भावनेनुसार ग्राहकांना कोणतीही अडचण भासू नये, यासाठी इंडियनऑइल प्रयत्नशील असल्याचे कंपनीने स्पष्ट केले. दरम्यान, नागरिकांनी घाबरून जाऊन अनावश्यक मोठ्या प्रमाणात इंधन खरेदी करू नये, असे आवाहनही कंपनीने केले आहे. इंधन उपलब्धतेसंदर्भातील माहिती मिळविताना ग्राहकांनी केवळ अधिकृत संस्था आणि इंडियनऑइलकडून जारी करण्यात येणाऱ्या अधिकृत माहितीलाच विश्वास ठेवावा, असेही कंपनीने नमूद केले आहे.

### खासदार प्रा. डॉ. मेधा कुलकर्णी यांना सलग दुसऱ्यांदा संसदरत्न पुरस्कार




पुणे (स. गांवकरी) : संसदेतील सर्वोत्तम कामगिरीसाठी राज्यसभा खासदार प्रा. डॉ. मेधा विश्राम कुलकर्णी यांना सलग दुसऱ्यांदा 'संसदरत्न' पुरस्कार जाहीर झाला आहे. मेधा कुलकर्णी यांच्यासह महाराष्ट्रातून भाजपचे हेमंत सावरा, स्मिता वाघ, शिवसेनेचे डॉ. श्रीकांत शिंदे व नरेश मस्के यांचा या पुरस्कारांमध्ये समावेश आहे. प्राईम पॉईंट फाउंडेशनच्या वतीने लोकसभा आणि राज्यसभेतील उल्लेखनीय कार्याबद्दल या वर्षी खासदारांना 'संसदरत्न' पुरस्काराने सन्मानित करण्यात येते. पुरस्कारांचे यंदा १६ वे वर्ष होते. राज्यसभेची पहिलीच टर्म असलेल्या प्रा. डॉ. मेधा कुलकर्णी यांनी संसदेत सक्रिय सहभाग नोंदवत सर्वच आघाड्यांवर उल्लेखनीय व लोक-देशहिताचे मुद्दे मांडत प्रभावी कामगिरी केली. सर्वोत्तम कामगिरीसाठी डॉ. कुलकर्णी यांना सलग दुसऱ्या वर्षी हा पुरस्कार जाहीर झाला असून, महाराष्ट्रासाठी आणि विशेषतः पुण्यासाठी ही गौरवाची बाब ठरली आहे. प्रा. कुलकर्णी यांनी रेल्वे, महिला सुरक्षा, आरोग्य, ग्रामीण विकास, शिक्षण, सामाजिक न्याय, कॉर्पोरेट जिहादच्या संबंधित विषयांवर संसदेमध्ये सातत्याने मुद्देसूद भाष्य केले आहे. विशेष सत्रात, झिरो अवर, प्रश्नोत्तरे व विविध विषयांवरील चर्चेत सक्रिय सहभाग नोंदवला आहे. नुकत्याच झालेल्या अधिवेशनात त्यांनी महिला सुरक्षा, विमा सुरक्षा, रेनवॉटर हार्वेस्टिंग, आधार प्रमाणीकरण, आरटीई प्रवेश प्रक्रिया, शेतजमिनी याबाबत लक्षवेधी मांडल्या. पुरस्कार जाहीर झाल्यानंतर आनंद व्यक्त करताना प्रा. डॉ. मेधा कुलकर्णी म्हणाल्या, “सलग दुसऱ्यांदा संसदरत्न पुरस्कार जाहीर होणे आनंदाची गोष्ट आहे. हा सन्मान केवळ माझा नाही, तर जनतेच्या अपेक्षा संसदेत प्रभावीपणे मांडण्याच्या प्रयत्नांचा गौरव आहे. लोकशाहीत लोकप्रतिनिधीची खरी ओळख त्याच्या कृतिशीलतेत असते. जनतेच्या आशीर्वादाची ही पोचपावती आहे. यापुढेही लोकहितासाठी परखडपणे भूमिका मांडत राहील.”

### इंडियन ऑइलने मागणीच्या पार्श्वभूमीवर इंधन पुरवठ्याची दिली हमी

पुणे (स. गांवकरी) : देशसेवा आणि जनसेवा हे ब्रीद कायम ठेवत, इंडियन ऑइल कॉर्पोरेशन लिमिटेडने देशभरात पेट्रोल (एमएस), डिझेल (एचएसडी) आणि एलपीजीचा अखंड पुरवठा सुनिश्चित करण्यासाठी आपले ऑपरेशन्स आणि लॉजिस्टिक्स समन्वय सुरू ठेवला आहे. अनेक भागांमध्ये इंधनाच्या मागणीत झालेल्या तीव्र वाढीच्या पार्श्वभूमीवर ही पावले उचलण्यात आली आहेत. अलीकडील काळात, अनेक राज्यांमध्ये हंगामी कृषी कामकाज आणि पीक कापणी मोहिमेमुळे इंडियनऑइलला पेट्रोलियम उत्पादनांच्या मागणीत लक्षणीय वाढ अनुभवायला मिळाली आहे. याशिवाय, इतर पुरवठादारांच्या तुलनेत कमी किंमतीमुळे किरकोळ ग्राहकांचे इंडियनऑइल रिटेल आउटलेट्सकडे स्थलांतर तसेच संस्थात्मक आणि व्यावसायिक ग्राहकांचाही रिटेल इंधन केंद्रांकडे वाढता कल यामुळे अतिरिक्त मागणीचा दबाव निर्माण झाला आहे. इंडियनऑइल आपल्या विस्तृत देशव्यापी टर्मिनल्स, डेपो, पाइपलाईन्स, एलपीजी बॉटलिंग प्लांट्स आणि रिटेल आउटलेट्सच्या नेटवर्कद्वारे अखंड पुरवठा आणि वेळेवर पुनर्भरण कायम ठेवत आहे. “वी आर ऑलवेज देयर” या भावनेनुसार पुरवठा पथके, वाहतूक नेटवर्क, टर्मिनल ऑपरेशन्स आणि निवडक रिटेल आउटलेट्स 24x7 कार्यरत असून उत्पादनांची अखंड वाहतूक सुनिश्चित करत आहेत. इंडियनऑइल ग्राहकांना आश्वस्त करू इच्छिते की देशभरात पेट्रोल, डिझेल आणि एलपीजीचा पुरेसा साठा उपलब्ध आहे आणि सुरळीत व अखंड पुरवठा कायम ठेवण्यासाठी राज्य प्रशासनाशी जवळून समन्वय साधत सर्व आवश्यक उपाययोजना केल्या जात आहेत.

# दीक्षा म्हणजे आत्मशुद्धीचा पवित्र मार्ग : प्रवीण ऋषीजी

**जामखेड येथे दीक्षा महोत्सव ठरला ऐतिहासिक सोहळा**



जामखेड : (स. गांवकरी)

शहरातील महावीर भवन येथे आज दिनांक २० मे २०२६ रोजी जैन श्रावक संघ, जामखेड यांच्या वतीने अत्यंत भव्य, धार्मिक व भक्तिभावपूर्ण वातावरणात दीक्षा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले. या सोहळ्यात परमपूज्य प्रियदाजी म.सा. यांनी दीक्षा स्वीकारली. हा पवित्र क्षण उपस्थित भाविकांसाठी अत्यंत भावनिक व आध्यात्मिक अनुभूती देणारा ठरला.

या दीक्षा सोहळ्याला उपाध्याय परमपूज्य प्रवीण ऋषीजी म.सा. तसेच परमपूज्य सुनंदाजी म.सा. यांचे पावन सान्निध्य लाभले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण कार्यक्रम शिस्तबद्ध, विधिपूर्वक आणि आध्यात्मिक परंपरेनुसार संपन्न झाला. दीक्षा महोत्सव प्रसंगी बोलताना परमपूज्य प्रविण ऋषीजी म.सा.यांनी सांगितले की,दीक्षा हा केवळ एक धार्मिक संस्कार नसून आत्मशुद्धीचा, संयमाचा आणि मोक्षमार्गाकडे वाटचाल करण्याचा अत्यंत पवित्र व निर्णायक टप्पा आहे. या क्षणापासून साधकाने संसारिक बंधनांपासून दूर जात आत्मकल्याणाचा मार्ग स्वीकारलेला असतो.जैन धर्मातील पंचमहाव्रतांचे अहिंसा, सत्य, अचौर्य, ब्रह्मचर्य आणि अपरिग्रह पालन हे केवळ नियम नसून जीवनाला दिशा देणारे सर्वोच्च मूल्य आहेत.ही व्रते आत्मशुद्धीचा पाया असून प्रत्येक साधकाने त्यांचे कठोरतेने पालन करणे हेच खरे अध्यात्म आहे.

दीक्षेच्या प्रसंगी पंचमहाव्रतांचे अहिंसा, सत्य, अचौर्य, ब्रह्मचर्य आणि अपरिग्रह आजीवन पालन करण्याची शपथ देण्यात आली.

कार्यक्रमासाठी जामखेडसह परिसरातील तसेच बाहेरगावांतील भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली.

या कार्यक्रमासाठी मनमाड, संगमनेर, राहुरी,नगर, पाथर्डी, कडा, आष्टी, मिरजगाव, कर्जत, अरणगाव, पाटोदा, कुर्डुवाडी आदी ठिकाणांहून जैन बांधव मोठ्या श्रद्धेने उपस्थित होते. महावीर भवन परिसर भाविकांच्या गर्दीने फुलून गेला होता.या भव्य धार्मिक सोहळ्याचे नियोजन व व्यवस्थापन जैन श्रावक संघाच्या पदाधिकाऱ्यांनी अत्यंत काटेकोरपणे पार पाडले.जैन श्रावक संघाचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, महामंत्री, खजिनदार तसेच संचालक मंडळ आणि ट्रस्टी यांनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विशेष परिश्रम घेतले.

या कार्यक्रमासाठी आमदार रोहित पवार यांच्या मातोश्री सुनंदा पवार यांनी उपस्थित राहून महिलांना संबोधित केले.तसेच जामखेड नगर परिषदेच्या नगराध्यक्षा प्रांजल चिंतामणी या उपस्थित होत्या.

## अनुसूचित जाती उपवर्गीकरणाला तीव्र विरोध

पुणे : (स. गांवकरी)

अनुसूचित जातीच्या (SC) 'अ, ब, क, ड' उपवर्गीकरणाच्या मुद्द्यावर राज्यातील दलित समाजात तीव्र असंतोष निर्माण झाला आहे. या संदर्भात 'बार्टी' (डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था) कडे आतापर्यंत सुमारे ८० हजार ई-मेल प्राप्त झाले असून, त्यापैकी ८५% म्हणजेच ६५ ते ७० हजार ई-मेल हे या उपवर्गीकरणाच्या विरोधात आहेत. या पार्श्वभूमीवर, अनुसूचित जाती उपवर्गीकरण पुनर्विलोकन समितीचे राहुल डंबाळे यांनी विशेष मोहीम राबवून उपवर्गीकरणावर तीव्र आक्षेप नोंदविले आहेत. आता हा लढा अधिक तीव्र करण्यासाठी ३० जून रोजी मुंबई येथे विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनादरम्यान विधानसभेला घेराव घालण्याचे आंदोलन पुकारण्यात आले आहे. ३० जून रोजी मुंबईत होणाऱ्या या महा-घेराव आंदोलनाच्या पूर्वतयारीसाठी पुनर्विलोकन समितीच्या वतीने सध्या संपूर्ण महाराष्ट्रभर नियोजनाच्या




बैठका सुरू आहेत. गाव, तालुका आणि जिल्हा पातळीवर समाजबांधवांना एकत्र करून या आंदोलनात मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन केले जात आहे. या बैठकांना राज्यभरातून मोठा प्रतिसाद मिळत असून आंदोलनाची जय्यत तयारी सुरू आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर राज्य सरकारने उपवर्गीकरणाचा अभ्यास करण्यासाठी समिती गठित करून जनतेकडून हरकती व सूचना मागविल्या होत्या. राहुल डंबाळे यांच्या नेतृत्वाखाली राबविलेल्या विशेष मोहिमेमुळे अवघ्या काही दिवसांत बार्टीकडे हजारो आक्षेप नोंदवले गेले.

## पत्रकार औटी यांच्या परिवाराला महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाची सांत्वन भेट!



जुन्नर : (स. गांवकरी)

पुणे जिल्ह्यातील जुन्नर तालुक्यातील राजुरी येथील पत्रकार चंद्रकांत सुदाम औटी यांचे नुकतेच हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने दुःखद निधन झाले. त्यांच्या निधनामुळे पत्रकारिता क्षेत्रासह परिसरात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य संघटक संजय भोकरे व प्रदेश अध्यक्ष निलेश सोमाणी यांच्या सूचनेनुसार, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस तथा दैनिक समर्थ गांवकरीचे संपादक डॉ. विश्वासराव आरोटे, पश्चिम महाराष्ट्र संपर्कप्रमुख सुभाष डोके तसेच जुन्नर तालुका अध्यक्ष नयन डुंबरे यांनी आवटी यांच्या परिवाराची सांत्वन भेट घेतली. यावेळी उपस्थित मान्यवरांनी पत्रकार औटी यांच्या कार्याचा गौरव करताना सांगितले की, त्यांनी आपल्या पत्रकारितेच्या माध्यमातून आणि सहकार चळवळीद्वारे सर्वसामान्य जनतेचे प्रश्न सोडवण्यासाठी सातत्याने काम केले. आपल्या प्रभावी लिखाणातून त्यांनी समाजातील अनेक प्रश्नांना वाचा फोडली आणि लोकहिताचे कार्य केले. तसेच महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या वतीने औटी यांच्या कुटुंबाला आर्थिक मदत व किराणा साहित्य देऊन आधार देण्याचा प्रयत्न करण्यात आला. यावेळी डॉ. विश्वासराव आरोटे बोलताना म्हणाले की, "महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ आपल्या पत्रकार बांधवांच्या कुटुंबाच्या पाठीशी कायम उभा आहे. परिवारावर कोणतीही अडचण किंवा प्रश्न निर्माण झाल्यास पत्रकार संघ नेहमी मदतीसाठी तत्पर राहील." या भेटीद्वारे पत्रकार बांधवांमधील एकोपा, सामाजिक बांधिलकी आणि पत्रकार कुटुंबाप्रती असलेली संवेदनशीलता पुन्हा एकदा अधोरेखित झाली.

## अंतर्नादच्या प्रयोगाने रंगभूमीवर भक्तिरसाचा जिवंत वारीसोहळा

पुणे : (स. गांवकरी)

भाऊसाहेब भोईर यांच्या 'मोरया थिएटर्स' निर्मित 'अंतर्नाद – अ जर्नी टू द सोल' या संगीत नाटकाच्या शुभारंभाच्या प्रयोगाने प्रेक्षकांना प्रत्यक्ष वारीचा अनुभव दिला. विठ्ठलराव तुपे नाट्यगृहात झालेल्या या प्रयोगाला रसिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. विठ्ठल भक्ती, अध्यात्म, विज्ञान आणि आधुनिक विचार यांचा सुरेख संगम या नाटकातून अनुभवायला मिळाला.

नाटक सुरू होण्यापूर्वीच नाट्यगृह परिसर हरिनामाच्या गजराने आणि अभंगांनी भक्तिमय झाला होता. प्रवेशद्वारावर संजावटीतून करून वारीचे वातावरण साकारण्यात आले होते. नाट्यगृहात प्रवेश करणाऱ्या प्रत्येक रसिकाच्या कपाळी चंदनाचा टिळा लावून त्यांचे स्वागत करण्यात येत होते. विविध क्षेत्रांतील मान्यवर, वारकरी संप्रदायातील मंडळी, कला रसिक आणि युवा प्रेक्षकांनी नाट्यगृह खचाखच भरले होते. तिसरी घंटा



झाल्यानंतर 'सांगा विठ्ठल माझा मला पावलं का?' या अभंगाने नाटकाची सुरुवात होताच संपूर्ण सभागृह टाळ्यांच्या कडकडाटाने दुमदुमून गेले. लेखक विनोद रत्ना यांनी आधुनिक विचारांचा युवक 'डीके' अर्थात ज्ञानेश्वर कदम आणि त्याच्या अध्यात्माकडे होणाऱ्या प्रवासाची कथा प्रभावीपणे उभी केली आहे. सुरुवातीला वारीकडे अंधश्रद्धा म्हणून पाहणारा डीके विविध वारकऱ्यांच्या सहवासातून आत्मिक परिवर्तन अनुभवतो. “तुमच्या रक्तात पण वारी आहे,” हा संवाद नाटकाचा गाभा स्पष्ट करून जातो. विज्ञान आणि अध्यात्म यांचा संघर्ष आणि समन्वय संवादातून प्रभावीपणे मांडण्यात आला आहे.

दिग्दर्शक मनोज डाळिंबकर आणि सहायक दिग्दर्शक आकाश थिटे यांच्या कल्पक दिग्दर्शनामुळे नाटक अधिक प्रभावी ठरले. प्रकाशयोजना, ध्वनी, पारंपरिक वेशभूषा, नृत्यरचना आणि जिवंत नेपथ्यामुळे आळंदी, जेजुरी, दिंडी, पालखी आणि चंद्रभागेचा प्रवास रंगमंचावर साकारण्यात आला. प्रेक्षकांमधून निघणारी दिंडी, रिंगणातील घोडा आणि संतांची गळाभेट हे प्रसंग विशेष दाद मिळवून गेले. नाटकातील संगीत हे या प्रयोगाचे मोठे वैशिष्ट्य ठरले. अभंग, पोवाडा, गोंधळ आणि आधुनिक रॅप शैलीचा अनोखा संगम प्रेक्षकांना अनुभवायला मिळाला. निरंजन पेडगावकर यांच्या संगीतबद्ध चालींना गायक-वादकांनी समर्थ साथ दिली. 'विठ्ठल विठ्ठल'चा गजर, 'मल्हारी माझा राजा'चा जल्लोष आणि दिंडीवरील पदांनी वातावरण भारून गेले. प्रमुख भूमिकेत प्रणव सपकाळे यांनी डीकेच्या मनातील संभ्रम, तर्क आणि अध्यात्मिक परिवर्तन प्रभावीपणे साकारले. मनोज डाळिंबकर यांच्या 'जाधव साहेब' भूमिकेने प्रेक्षकांची मने जिंकली. मानसी कुलकर्णी यांच्या वृद्ध आजीच्या भूमिकेने अनेकांना भावूक केले. “जगणं आणि मरण यांच्या मधली जी पायवाट आहे ना, ती वारी आहे,” हा संवाद सभागृहात शांतता पसरवून गेला. प्रयोगानंतर अनेक प्रेक्षकांच्या डोळ्यांत अश्रू होते. काही जण अभंग गुणगुणत बाहेर पडत होते, तर काहींनी प्रत्यक्ष पंढरपूर वारी करण्याची इच्छा व्यक्त केली. “हे नाटक नाही, ही प्रत्यक्ष वारी आहे,” अशी प्रतिक्रिया एका ज्येष्ठ रसिकाने व्यक्त केली.

## रडू कोसळल्याच्या आठवणीबद्दल सांगत आहे सेहज राजपूत

नवी दिल्ली : (स. गांवकरी)

झी टीव्हीवरील 'जाने अनजाने हम मिले' या मालिकेत भात अहलावत (राघव) आणि आयुषी खुराणा (रीत) यांच्या प्रमुख भूमिका आहेत. या मालिकेकडे कौटुंबिक हिंसाचाराच्या कथानकामुळे अलीकडेच विशेष लक्ष वेधले गेले. यात सेहज राजपूत हिने उन्नतीची भूमिका साकारली आहे. पती विक्रांत (पुनीत राज) कडून तिला मानसिक, भावनिक आणि शारीरिक छळ सहन करावा लागतो. मात्र उन्नती अखेर त्याच्याविरोधात उभे राहत न्याय मिळवते आणि त्यामुळे तिची कथा ताकद आणि न्यायाचे प्रतीक ठरते. आता भूतकाळातील वेदना मागे सोडून उन्नती ध्रुव (रोहित धीमान) सोबत लग्न करून आयुष्याला पुन्हा एक संधी देण्यास तयार झाली आहे. सेहज राजपूत सांगते की मागील काही महिन्यांत अशा भावनिकदृष्ट्या कठीण दृश्यांचे चित्रीकरण करणे



तिच्यासाठी खूप आव्हानात्मक ठरले. मात्र, उन्नतीची ही कहाणी जर एखाद्या तरी कौटुंबिक हिंसाचार सहन करणाऱ्या व्यक्तीला धैर्य देऊ शकली तर तिला आपले काम खऱ्या अर्थाने यशस्वी वाटेल.

सेहज राजपूत म्हणाली, “अशा तीव्र आणि भावनिकदृष्ट्या अवजड दृश्यांमध्ये काम करताना माझ्यावर एक अभिनेत्री आणि व्यक्ती म्हणूनही खूप परिणाम झाला.

# १०० कोटींचा उमरी-नायगाव रस्ता 'वादाच्या खाईत'

- निकृष्ट कामांचा महामेळा; अतिक्रमणांना संरक्षण, रुंदीमध्ये मनमानी — संतप्त नागरिकांचा एल्गार

नायगाव : (स. गांवकरी)

तालुक्यातील उमरी-नायगाव या महत्त्वाच्या मार्गाच्या तब्बल १०० कोटी रुपयांच्या रस्ता प्रकल्पावर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, निकृष्ट दर्जाचे काम, मनमानी पद्धतीने बदलण्यात आलेली रस्त्याची रुंदी, अतिक्रमणांना दिलेले संरक्षण आणि प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे हा संपूर्ण प्रकल्पच आता वादाच्या भोवऱ्यात सापडला आहे. जनतेच्या कराच्या पैशातून उभारला जाणारा हा प्रकल्प भ्रष्टाचार आणि गैरव्यवहाराचे केंद्र बनल्याची संतप्त



चर्चा नागरिकांमध्ये उघडपणे सुरू झाली आहे. उमरी आणि नायगाव या दोन प्रमुख शहरांना जोडणाऱ्या या महत्त्वाच्या मार्गाचे काम सध्या वेगाने सुरू असले तरी प्रत्यक्षात कामाचा दर्जा अत्यंत खालावलेला असल्याचा आरोप होत आहे. अनेक ठिकाणी रस्त्याची रुंदी कमी-जास्त करण्यात आली असून काही भागांत प्रभावशाली लोकांची अतिक्रमणे वाचवण्यासाठी मुद्दाम रस्ता व नाली वाकवण्यात आल्याची चर्चा रंगली आहे. परिणामी भविष्यात मोठ्या प्रमाणात अपघात होण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

बाजारपेठ, शाळा, क्लासेस आणि वर्दळीच्या भागात काम अत्यंत संथ गतीने सुरू असल्याने नागरिकांना धूळ, चिखल आणि वाहतूक कोंडीचा प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे. अनेक ठिकाणी नाल्यांची कामे अपूर्ण अवस्थेत पडून आहेत. पावसाळा तोंडावर असताना ही परिस्थिती आणखी गंभीर होण्याची शक्यता निर्माण झाली असून व्यापारी, विद्यार्थी, पादचारी आणि वाहनचालकांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे.

स्थानिक नागरिकांनी संबंधित ठेकेदार, अभियंते आणि प्रशासनावर संगनमताचे गंभीर आरोप करत उच्चस्तरीय चौकशीची मागणी केली आहे. “काम सुरू झाल्यापासून तक्रारींचा पाऊस सुरू आहे; मात्र अधिकारी केवळ पाहणीचे आश्वासन देतात, प्रत्यक्ष कारवाई होत नाही,” अशी संतप्त प्रतिक्रिया नागरिकांनी व्यक्त केली. काही भागांत प्रभावशाली व्यक्तींची अतिक्रमणे कायम ठेवून सर्वसामान्य नागरिकांवर अन्याय केला जात असल्याचा आरोपही पुढे आला आहे. त्यामुळे या प्रकल्पात मोठ्या प्रमाणावर आर्थिक गैरव्यवहार झाल्याची चर्चा आता चव्हाट्यावर आली आहे.

दरम्यान, या संपूर्ण प्रकरणाची जिल्हाधिकाऱ्यांनी स्वतः पाहणी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी ग्रामस्थ, व्यापारी, पादचारी आणि नागरिकांनी जोर धरली आहे. अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही देण्यात आला आहे.

उमरी-नायगाव रस्ता प्रकल्पातील आणखी एक धक्कादायक प्रकार समोर आला असून पाटबंधारे विभागाची संरक्षण भिंत कोणतीही अधिकृत परवानगी न घेता रात्रीतून पाडण्यात आल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे.

या संदर्भात पाटबंधारे विभागाचे उपविभागीय अभियंता रामेश्वर पवार यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी सांगितले की, “रात्री दोननंतर हा प्रकार घडला. आम्हाला कोणतीही पूर्वकल्पना देण्यात आली नव्हती. दुसऱ्या दिवशी संबंधित ठेकेदाराने पत्र दिले; मात्र नियमबाह्य पद्धतीने भिंत पाडणे योग्य नाही.”

या प्रकरणी वरिष्ठांच्या आदेशानुसार नायगाव पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यासाठी अधिकारी शुक्रवारी गेले होते; मात्र पोलीस निरीक्षक बाहेरगावी असल्याने शनिवारी रीतसर तक्रार दाखल करण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले.